# मराठी निसर्गाच्या वातावरणात भव्य पॅरॅलिसिस सेंटर

हायड्रोथेरपी | पंचकर्म | फिजिओथेरपी भव्य उपचार केंद्र



फिजिओथेरपी पंचकर्म थेरपी हायड्रोथेरपी

अनुराधा पॅरॅलिसिस सेंटर

मामाचा मळा, रुईछत्तीसी, नगर-सोलापूर रोड, अहिल्यानगर

9552562520 | 9226983043 | 7820861048

24 x 7 रुग्ण सेवा । तज्ज्ञ डॉक्टर व थेरपिस्ट । आधुनिक उपचार सुविधा, कार्यवेळ : सकाळी ९ ते सायं.७






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रूपये अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०९.१०.२०२६ अंक नं. १६२ वर्ष ६१ वे दैनिक वर्ष ६३ वे ANR/022/2018-2020


# आधार पडताळणीमुळे दस्त नोंदणीचा वेग मंदावला; नगरच्या सब रजिस्ट्रार कार्यालयात नागरिकांचे हाल

## ऑपरेटरना तांत्रिक प्रशिक्षण देण्याची मागणी

नगर - दस्त नोंदणी प्रक्रियेत आधार पडताळणी अनिवार्य करण्यात आल्यानंतर अहिल्यानगर येथील सब रजिस्ट्रार कार्यालयातील कामकाजाचा वेग लक्षणीयरीत्या मंदावला आहे. पूर्वी तासाला ८ ते १० दस्तांची नोंदणी होत असे, मात्र सध्या ही संख्या अवघ्या २ ते ४ वर आली आहे. परिणामी कार्यालयात नागरिकांची गर्दी वाढत असून अनेकांना तासन्तास ताटकळत थांबावे लागत आहे.

### तांत्रिक अडचणी आणि प्रशिक्षणाचा अभाव

आधार पडताळणीदरम्यान बायोमेट्रिक ठसे जुळण्यास वेळ लागणे, सर्व्हरमधील व्यत्यय यांसारख्या तांत्रिक अडचणी वारंवार येत आहेत. विशेषतः वयोवृद्ध नागरिकांच्या बोटांचे ठसे स्पष्ट न उमटल्याने त्यांची पडताळणी पूर्ण होण्यास बराच वेळ जातो. मात्र यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे, ही प्रणाली हाताळणाऱ्या ऑपरेटरकडे आवश्यक आयटी व तांत्रिक प्रशिक्षणाचा अभाव असल्याचे दिसून येत आहे. अडचण आल्यास त्यावर तातडीने मार्ग काढण्याचे कौशल्य नसल्याने प्रक्रिया आणखी लांबते.

### सर्वच घटकांना फटका

या विलंबाचा फटका वृद्ध नागरिक, महिला, दूरच्या गावांहून येणारे नागरिक तसेच आजारी व्यक्तींना सर्वाधिक बसत आहे. याशिवाय दस्त नोंदणीसाठी नियमित येणारे वकील, बँकांचे अधिकारी आणि विविध कंपन्यांचे प्रतिनिधी यांचेही कामकाज खोळंबत आहे. दिवसभर थांबूनही दस्त प्रलंबित राहिल्यास दुसऱ्या दिवशी पुन्हा कार्यालयात चकरा माराव्या लागत असल्याने वेळ, पैसा आणि श्रम वाया जात असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

### निर्णय योग्य, अंमलबजावणीत सुधारणा हवी

मालमत्ता व्यवहारांमधील फसवणूक रोखण्यासाठी आणि व्यवहारांना कायदेशीर सुरक्षितता देण्यासाठी आधार पडताळणी अनिवार्य करण्याचा शासनाचा निर्णय योग्य व स्वागतार्ह असल्याचे सर्वच स्तरांतून मान्य केले जात आहे. बनावट व्यक्ती उभी करून होणाऱ्या व्यवहारांना यामुळे आळा बसणार आहे. मात्र या चांगल्या निर्णयाची अंमलबजावणी सुरळीत होण्यासाठी आवश्यक तांत्रिक पायाभूत सुविधा व कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

आयटी विभागाकडून ऑपरेटरना आधार पडताळणी प्रणालीचे सखोल प्रशिक्षण देण्यात यावे., तांत्रिक अडचणी तत्काळ सोडवण्यासाठी निष्णात तांत्रिक कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन व मदत उपलब्ध करून द्यावी., वृद्ध व आजारी नागरिकांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याचा विचार व्हावा., शासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन ठोस उपाययोजना करावी व नागरिकांचा वेळ वाचवावा, आदी मागण्या करण्यात आल्या.

सुरक्षिततेसाठी घेतलेला हा निर्णय नागरिकांच्या गैरसोयीचे कारण ठरू नये, यासाठी प्रशासनाने तत्परतेने पावले उचलावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# चास शिवारात झाडाला गळफास घेत आत्महत्या

नगर - नगर तालुक्यातील चास शिवारात पिंपळगाव कौडा रोडवरील एका शेतात झाडाला गळफास घेत एका ४८ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. विठ्ठल नारायण रासकर (रा. चास, ता. नगर) असे मयताचे नाव आहे.

विठ्ठल रासकर हे झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्यावर तेथील पोलीस पाटील रासकर यांनी घटनास्थळी भेट दिली, मयताचे नातेवाईक तुषार रासकर यांनी त्यांना खासगी रूग्णवाहिकेव्दारे उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे दाखल केले. परंतु, तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. तोडमल यांनी तपासणी करून त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस अमलदार दाते करत आहेत.


नवरात्र उत्सवातील उपवासांसाठी ग्राहकांच्या पसंतीचा.. साबुदाण्याचा एकमेव ब्रॅण्ड

सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट

राजमोती साबुदाना

RAJ MOTI

* इन्स्टंट साबुदानासुद्धा उपलब्ध. एक्स्ट्रा सुपरफाइन साबुदाना

-: स्टॉकिस्ट :-

मे. कांतीलाल घेवरचंद शिंगवी

दाळ मंडई, अहिल्यानगर.

☎ : 2344823/9422220723

लोकेश मार्केटिंग 9766045549

खास नवरात्रीसाठी फराळी पदार्थांचे माहेरघर

१८+१८= ३६ प्रकार

लक्ष्मण एजन्सीज 9890963100

SONI TILES Since 1965

AND MARBLE INDUSTRIES

Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720

Mob. 9372497999

Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite

सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

धमाकेदार लूट लो ऑफर

रु. १०० सेल | सर्व काही फक्त १०० रुपयांत

दि.८,९,१० ऑक्टोबर २०२६

गुरुवार, शुक्रवार, शनिवार । दु. १२ ते रात्री ८ पर्यंत

कुर्ती * परफ्युम * वन पीस * गॉगल * बॉटम * पर्स * पॅण्ट * लहान मुलांचे टॉप बॉटम * लेडीज ज्वेलरी * जेन्टस शर्ट टी-शर्ट * ब्लाऊज * दुपट्टा * पेटीकोट, अजून बरेच काही..

मर्यादित स्टॉक लवकर या फक्त ३ दिवसांची भन्नाट ऑफर..

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल

मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटी लि.

'रामकृष्ण भवन', माळीवाडा, अहिल्यानगर - ४१४ ००१.

फोन : ०२४१-२३४५०३४, मो. ८०५५८८९९०१

सावेडी उपनगरात शॉप विकत घेणे

नगर जिल्ह्यातील नामवंत व आर्थिक भक्कम पाया असलेल्या पतसंस्थेसाठी कुष्ठधाम रोड, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड, व लगतच्या मोक्याच्या ठिकाणी रोडटच ५०० ते १००० स्के. फुट आर.सी.सी. बांधकाम असलेले तळमजला (ग्राऊंड फ्लोअर) शॉप विकत घेणे आहे. जागेच्या सर्व कागदपत्रांसह २० ऑक्टोंबर २०२६ पर्यंत संपर्क करावा.

M. 94222 20342, 94222 22217

सोनेतारण कर्ज ८.००% व्याजदर

सेव्हींग खात्यावर ६.५०% आकर्षक व्याजदर


# दारूच्या नशेत वाहन चालवत वाहतूक पोलिसावर केला हल्ला

## केडगाव बायपास परिसरातील घटना, दोघांवर गुन्हा दाखल

नगर - वाहतूक नियमनाचे कर्तव्य बजावत असलेल्या शहर वाहतूक शाखेच्या पोलिसावर दारुच्या नशेत असलेल्या दोन तरुणांनी जीवघेणा हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. केडगाव बायपास परिसरात ही ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घटना घडली असून, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस कर्मचारी अनिल नामदेव आवारे यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे आपले सहकारी अधिकारी यांच्यासह केडगाव बायपास परिसरात वाहतूक नियमनाचे आपले शासकीय कर्तव्य बजावत होते. यादरम्यान आरोपी प्रेमराज हनुमंत तोगे (वय २२)आणि रेवणनाथ वैजीनाथ आव्हाड (वय २२, दोघे रा. बीड) हे दोघे जण एका हिरो स्प्लेंडर मोटार सायकलवरून तेथून जात होते. ते दोघेही दारूच्या अमलाखाली अत्यंत धोकादायक पद्धतीने वाकडी तिकडी गाडी चालवताना आढळून आले.

जेव्हा पोलिसांनी त्यांना हटकले, तेव्हा या दोन्ही आरोपींनी मद्यधुंद अवस्थेत थेट शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला. आरोपींनी कर्तव्य बजावत असलेल्या फिर्यादी अनिल आवारे यांची कॉलर पकडून त्यांच्यासोबत झटापट केली आणि त्यांना चापटीने मारहाण केली. एवढेच नव्हे तर, या झटापटीदरम्यान फिर्यादीच्या शासकीय गणवेशाचे बटण व नेम प्लेट देखील तोडण्यात आली.

या प्रकरणी पोलीस कर्मचारी अनिल आवारे यांच्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींविरोधात भारतीय न्याय संहितेचे कलम १९२, ३२४ (४), ३ (५) सह मोटार वाहन कायदा १८५ नुसार कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.





भव्य ज्वेलरी प्रदर्शन

12, 13 एवं 14 अक्तूबर

होटल आइरिस प्रीमियर, अहिल्यानगर

खूबसूरत आभूषणों का विशेष कलेक्शन।

आइए, हमारे नवीनतम डिज़ाइन्स का अनुभव लें और हर खास मौके के लिए अपने पसंदीदा आभूषण चुनें।

558, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे | 92255 84990 / 80555 60222

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# हद्दपारी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आरोपीला पकडले

नगर – जिल्ह्याच्या स्थलसीमेच्या हद्दीतून एक वर्षाकरिता हद्दपार करण्यात आलेला असतानाही, प्रशासनाच्या किंवा शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय नगर शहरात फिरताना आढळलेल्या एका गुन्हेगाराविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरवर अस्लम शेख उर्फ भिम्या (वय ३५, रा. सुभेदार गल्ली, झेंडीगेट, अहिल्यानगर) असे आरोपीचे नाव आहे.

हद्दपार प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी संबंधित आरोपीला अहिल्यानगर जिल्ह्याच्या स्थलसीमेच्या हद्दीतून एक वर्षासाठी हद्दपार केले होते. असे असतानाही ८ ऑक्टोबर रोजी दुपारी १ ते ३ वाजण्याच्या सुमारास आरोपी सरवर शेख हा हद्दपार आदेशाचे उल्लंघन करून सुभेदार गल्ली, झेंडीगेट परिसरात फिरत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांच्या तपासणी दरम्यान सदर आरोपीकडे हद्दपार प्राधिकारी अथवा महाराष्ट्र शासनाची कोणतीही लेखी पूर्वपरवानगी नसल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी पो.कॉ.दत्तात्रय हरिदास कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्याच्या विरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सीना नदीच्या पूर नियंत्रण रेषेचे अद्ययावत पुनर्सर्वेक्षण करा

## सुमारे ३५ हजार नागरिकांच्या बांधकामांना अडथळा; नदी रुंदीकरण व खोलीकरणानंतर तांत्रिक पुनर्मूल्यांकन करा; पूररेषाबाधित नागरिक कृती समितीची आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे मागणी

नगर – अहिल्यानगर शहरातून वाहणाऱ्या सीना नदीच्या सुमारे १४ किलोमीटरच्या पात्रातील २०१९ मधील पूर नियंत्रण रेषेचे अद्ययावत पुनर्सर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी सीना नदी पूररेषाबाधित नागरिक कृती समितीच्या वतीने महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सीना नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाचे काम सुरू असल्याने या कामांचा पूरप्रवाहावर होणारा परिणाम तपासून पूर नियंत्रण रेषेचे तांत्रिक पुनर्मूल्यांकन करावे, अशी भूमिका समितीने मांडली.

सीना नदीच्या विद्यमान पूर नियंत्रण रेषेमुळे शहरातील प्लॉटधारक, शेतकरी, जमीनमालक आणि रहिवाशांच्या विकासकामांवर परिणाम होत असल्याचे समितीने निवेदनात म्हटले आहे. सुमारे ३५ हजार नागरिकांना पूररेषेमुळे बांधकाम करता येत नसल्याचा दावा समितीने केला. काही लेआउटला मंजुरी मिळालेली असतानाही पूररेषेच्या निर्बंधांमुळे बांधकामासाठी परवानगी मिळण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या मालमत्तेच्या विकासावर मर्यादा येत असून, महानगरपालिकेच्या महसुलावरही परिणाम होत असल्याचे समितीने नमूद केले.

समितीच्या म्हणण्यानुसार, सीना नदीच्या उगमस्थानापासून अहिल्यानगर शहराचे अंतर सुमारे १५ किलोमीटर आहे. नदीला यापूर्वी मोठा पूर आल्याची किंवा त्यात जीवितहानी झाल्याची घटना नसल्याचेही समितीने निवेदनात म्हटले आहे. मात्र, पूर नियंत्रण रेषेबाबतचा निर्णय केवळ या मुद्द्यांवर आधारित न ठेवता अद्ययावत तांत्रिक सर्वेक्षण, नदीची वहनक्षमता, पूरप्रवाह आणि भविष्यातील पूरधोके यांचा शास्त्रीय अभ्यास करून घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने १० फेब्रुवारी २०२६ रोजी पूररेषेसंदर्भात घेतलेल्या शासन निर्णयानुसार गठित तज्ज्ञ समितीच्या कार्यकक्षेत सीना नदीचा विषय समाविष्ट करून आवश्यक अभ्यास करण्यात यावा, अशी मागणी कृती समितीने केली आहे.

पूररेषांचे पुनर्सर्वेक्षण, पूररेषाबाधित क्षेत्रातील अधिकृत इमारतींचा पुनर्विकास आणि विकास नियंत्रण नियमांबाबतच्या तरतुदींचा विचार करताना नदीलगतची परिस्थिती, भविष्यातील विकास, विकासाचा वाढता दबाव, नदीची वहनक्षमता, प्रवाहाची दिशा आणि विद्यमान बांधकामांच्या जोत्यांची पातळी यांसारख्या तांत्रिक बाबी तपासणे आवश्यक असल्याचे समितीने म्हटले आहे.

सीना नदीच्या विद्यमान ब्लू फ्लड लाइन आणि रेड फ्लड लाइनचा आधार, संबंधित सर्वेक्षण, नकाशे, जलवैज्ञानिक निकष आणि तांत्रिक माहिती यांची अधिकृत पडताळणी करावी. आवश्यक असल्यास सक्षम तांत्रिक संस्थेमार्फत अद्ययावत भौगोलिक, जलवैज्ञानिक आणि जलप्रवाहविषयक सर्वेक्षण करण्यात यावे. या सर्वेक्षणातून पूर नियंत्रण रेषेत बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाल्यास लागू कायदेशीर प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाही करावी, अशी सूचना समितीने केली.

सीना नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाचे काम सुरू असल्याने या कामांचा नदीची वहनक्षमता, पूरप्रवाह, प्रवाहाची दिशा, पाण्याची पातळी आणि पूरग्रस्त क्षेत्रावर होणारा संभाव्य परिणाम यांचा सविस्तर तांत्रिक अभ्यास करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.


सीना नदीच्या सुमारे १४ किलोमीटरच्या पात्रातील २०१९ मधील पूर नियंत्रण रेषेचे अद्ययावत पुनर्सर्वेक्षण करण्यात यावे, अशी मागणी सीना नदी पूररेषाबाधित नागरिक कृती समितीच्या वतीने आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. (छायाचित्र – लहू दळवी)

नदी सुधारणा प्रकल्पाचा अधिकृत आराखडा, तांत्रिक अहवाल आणि जलवैज्ञानिक अभ्यास उपलब्ध असल्यास तो नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करावा. नदी रुंदीकरण व खोलीकरणाची कामे पूर्ण झाल्यानंतर पूर नियंत्रण रेषेचे पुनर्मूल्यांकन करण्याची आवश्यकता आहे किंवा नाही, याबाबत सक्षम तांत्रिक प्राधिकरणाचा अभिप्राय घ्यावा, असेही समितीने सुचविले.

तसेच, शासनाने गठित केलेल्या तज्ज्ञ समितीने सीना नदीसंदर्भात कोणतेही सर्वेक्षण किंवा अभ्यास केला आहे का, याची अधिकृत माहिती पूररेषाबाधित नागरिकांना उपलब्ध करून द्यावी. अहिल्यानगर शहराच्या नवीन नियोजित विकास आराखड्याच्या अनुषंगाने पूररेषेमुळे नागरिकांच्या जमिनी, मालमत्ता, विकासाच्या शक्यता आणि भविष्यातील पुनर्विकासावर होणाऱ्या परिणामांचा विचार करून निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

निवेदन स्वीकारताना आयुक्त यशवंत डांगे यांनी सीना नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाचे काम सुरू असल्याचे सांगितले. या कामासाठी नदीची हद्द निश्चित करणारे खांब लावण्यात आले आहेत; मात्र काही नागरिक ते काढून टाकत असल्याने काम करताना अडचणी निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सीना नदीच्या खोलीकरणासाठी निधी उपलब्ध असून, नदीच्या पात्रात माती टाकून काही ठिकाणी शेती तयार करण्यात आल्याने नदीचे मूळ पात्र आणि रुंदी यावर परिणाम झाल्याचे आयुक्तांनी सांगितले. नदीचे रुंदीकरण व खोलीकरण पूर्ण होणे आवश्यक असून, त्यानंतरच पूररेषेबाबत शासनाकडे पुढील पाठपुरावा करता येईल. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्व नागरिकांनी नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाच्या कामाला सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डांगे यांनी कृती समितीच्या माध्यमातून केले.

यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक महेश लोंढे, रोहन सानप, अभिजीत बुरुडे, प्रकाश जैन, गोरख बोरुडे, प्रिन्स फुलसौंदर, शरद ठाणगे, रत्नाकर कुलकर्णी, अशोक आगरकर, अतुल जाधव, श्याम व्यवहारे, शिवाजी जाधव, अविनाश साळुंखे, अनिल ससाणे, अनिल शिंदे आदी उपस्थित होते.

## मार्केट यार्ड परिसरातून ॲक्सेस मोपेडची चोरी

नगर – मार्केट यार्ड परिसरात त्रिमुखे हॉस्पिटलसमोर पार्किंग करून ठेवलेली सुझुकी कंपनीची क्सेस मोपेड (क्र. एमएच १६ ईए ३४८३) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ६ ऑक्टोबर रोजी दुपारी दोन ते चार वाजेच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत वैभव यशवंत साळवे (वय २८, रा. पाण्याच्या टाकीजवळ, घोसपुरी, ता. नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार केकाण करत आहेत.

# तरुणाला कामासाठी बोलावून लाकडी दांडक्याने बेदम मारहाण

## दुचाकी वाहनाचेही केले नुकसान, महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – एका तरुणाला घराच्या दरवाजाचे काम करण्यासाठी घरी बोलावून लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना भिंगार कॅम्प पोलिस ठाण्याच्या हद्दीत वाकोडी फाटा (ता.नगर) येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात एका महिलेसह तिघांच्या विरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत साहिल पप्पु साबळे (वय २०, रा. अण्णाभाऊ साठेनगर, हरीमळा, दरेवाडी) या मजुरी काम करणाऱ्या तरुणाने फिर्याद दिली आहे. एका महिलेने फिर्यादीला घराच्या दरवाजाचे काम करण्यासाठी फोन करून घरी बोलावले. फिर्यादी तिथे गेले असता, घराजवळ त्यांच्यावर लाकडी दांडक्याने हल्ला करून दुखापत करण्यात आली.

यावेळी उपस्थित असलेल्या इतरांनीही फिर्यादीला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादीच्या वाहनाचे नुकसान करण्यात आले आणि मारहाणीच्या झटापटीत मोबाईल फोन देखील गहाळ झाला. एवढेच नव्हे तर, वादादरम्यान फिर्यादीच्या घरी जाऊन कुटुंबीयांना देखील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी फिर्यादीच्या जबाबानंतर एक महिला, तसेच शिवम साठे व अन्य एका अनोळखी इसमा विरुद्ध गंभीर दुखापत आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यांच्या निषेधार्थ एमआयडीसीतील उद्योजकांचा 'महावितरण'वर मोर्चा

## अतिभाराने वारंवार वीजखंडित होत असल्याने आर्थिक नुकसानीचा फटका; एमआयडीसीतील उद्योगांना अखंडित वीजपुरवठा देण्याची मागणी

नगर – अहिल्यानगर एमआयडीसी परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने औद्योगिक उत्पादनावर परिणाम होत असून उद्योजकांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. या समस्येकडे महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीजच्या (आमी) वतीने महावितरणच्या अहिल्यानगर येथील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, उपाध्यक्ष राजेंद्र शुके,रोहन गांधी, सतिश गवळी, मिलिंद कुलकर्णी, राजेंद्र कटारिया, दिलीप अकोलकर, मिलिंद भद्रे, राजेंद्र कुलकर्णी, सुमित सोनवणे, रोहन गांधी, प्रवीण जुंदरे, सतीश गवळी, अमोल घोलप, नावंदर आदींसह उघोजक यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवार निवेदन दिले.



एमआयडीसी परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठेकडे महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीजच्या वतीने महावितरणच्या अहिल्यानगर येथील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवार यांना निवेदन दिले. (छायाचित्र – उदय जोशी)

अहिल्यानगर एमआयडीसी परिसरात मागील सहा ते सात महिन्यापासून सातत्याने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत विशेषता डी एफ ए आणि एल ब्लॉक मध्ये दररोज वीजपुरवठा खंडित होत आहे यामुळे उद्योजकांना मोठी आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे तसेच एमआयडीसीतील इतर ब्लॉक मध्ये वीजपुरवठाच्या लपंडाव सुरू आहे

जयद्रथ खाकाळ म्हणाले वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे उत्पादन प्रक्रियेत अडथळा निर्माण होत आहे मशीनरी बंद पडणे कच्च्या मालाची नुकसान होणे उत्पादन क्षमतेवर परिणाम होणे वेळेत ऑर्डर पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत याचा थेट परिणाम उद्योजकांच्या उत्पादन खर्चावर व आर्थिक व्यवहारावर होत आहे ही परिस्थिती अशीच राहिल्यास अनेक कारखाने बंद ठेवण्याची वेळ येऊ शकते. अहिल्यानगर मध्ये उद्योगाची वाढती संख्या आणि विजेची वाढती मागणी लक्षात घेता परिसरात नवीन वीज उपकेंद्र उभारणे किंवा विद्यमान उपकेंद्र ची क्षमता व लोड वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. या संदर्भात आमी संघटनेच्या वतीने यापूर्वी पाठपुरावा केला आहे डिसेंबर पर्यंत हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन मिळाले आहे

राजेंद्र शुक्रे म्हणाले उद्योगांना अखंडित वीज पुरवठा पूर्ण करून देणे ही औद्योगिक विकास साठी अत्यंत महत्त्वाचे बाब आहे. वारंवार वीज पुरवठा खंडित होणे हे औद्योगिक उत्पादन, रोजगार आणि संपूर्ण औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होणार आहेत. जवळपास तीस ते चाळीस हजार कामगार एमआयडीसीत कामाला आहेत त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे आम्हाला मिळालेली कामे वेळेत पूर्ण होत नाहीत. सातत्याने समस्या सामोरे जावे लागते उद्योग वाढवण्यापेक्षा समस्या लढणे हाच मोठा उद्योग होऊन बसलाय. नगरपेक्षा इतर शहरं पुढे गेले आहेत नवीन उद्योग वाढले नाहीत उलट नगर शहराच्या बाहेर उद्योग गेले. नगरमध्ये जे ३० हजार कामगार आहेत ते कमीत कमी लाखभर कामगार असते.

# नऊ वर्षांपासून बलात्काराच्या गुन्ह्यात फरार आरोपीला बेड्या

## विशेष मोहिमेत पोलिसांची कारवाई, स्वत:ची ओळख लपवून सुरु होता वावर

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान, गेल्या ९ वर्षांपासून बलात्काराच्या गंभीर गुन्ह्यात फरार असलेला एक आरोपी पोलिसांच्या हाती लागला आहे. कोतवाली पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने श्रीगोंदा परिसरातून या आरोपीस शिताफीने जेरबंद केले आहे. रिपुस उर्फ इपुस मेहरा भोसले (रा. लोणीव्यंकनाथ, ता. श्रीगोंदा) असे या आरोपीचे नाव आहे.


९ वर्षांपासून बलात्काराच्या गुन्ह्यात फरार आरोपीला बेड्या ठोकल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) यांच्या आदेशानुसार १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांना जेरबंद करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना फरार आरोपींचा शोध घेण्याबाबत सख्त आदेश दिले होते. या आदेशाचे पालन करत कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी गुन्हे शोध पथकाला विशेष सूचना दिल्या होत्या.

तपासादरम्यान पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना गोपनीय माहिती मिळाली की, कोतवाली पोलीस ठाण्यात सन २०१७ मध्ये दाखल असलेल्या बलात्काराच्या गुन्ह्यात मागील ९ वर्षांपासून फरार असलेला आरोपी रिपुस उर्फ इपुस मेहरा भोसले हा श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणार आहे. मिळालेल्या या माहितीची खात्री करून कोतवालीचे सहायक पोलीस निरीक्षक विशाल चिटणीस व पथकाने श्रीगोंदा पोलीस ठाण्यात धाव घेतली. श्रीगोंदा पोलिसांच्या विशेष मदतीने श्रीगोंदा येथे सापळा रचून रिपुस भोसले यास ताब्यात घेण्यात आले. सदर कारवाई पो.नि.नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाली पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदारांनी केली.

## टिळक रोडवरून ॲक्टिव्हा मोपेडची चोरी

नगर – शहरातील आयुर्वेद कॉलेज परिसरात असलेल्या टिळक रोडवरील एका फायनान्स कंपनीच्या कार्यालयासमोर पार्किंग करून ठेवलेली होंडा कंपनीची क्टिव्हा मोपेड (क्र. एमएच १६ सीआय ०२२८) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.२० ते ८.४० वाजेच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत विराज सुनिल बनसोडे (वय २२, रा. सदर बाजार, भिंगार)यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पोलीस अंमलदार भालेराव करत आहेत.

## मनिष नहार यांचे हृदयविकाराने निधन

नगर – श्री बंगला, स्टेशन रोड येथील रहिवासी मनिष मनसुखलाल नहार (वय ५६) यांचे ९ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १० ऑक्टोबर रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, मुलगा, पुतण्या, पुतणे असा परिवार आहे. अमन नहार यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# केंद्रीय पथकाकडून नगर तालुक्यात दुष्काळाची पाहणी

## शेतकऱ्यांनी व्यथा मांडत तातडीने मदतीची सरकारकडे केली मागणी

नगर – नगर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथकाने ९ ऑक्टोबर रोजी चास आणि निमगाव वाघा येथे भेट देऊन शेती व पाणीसाठ्याची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांच्या नुकसानीची तसेच पाणीटंचाईच्या परिस्थितीची माहिती घेण्यात आली. केंद्रीय पथकासमोर शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडत तातडीने मदत देण्याची मागणी केली.

चास येथे केंद्रीय पथकाने सोयाबीन, बाजरी आणि कांदा या पिकांची पाहणी केली. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून, अपेक्षित उत्पादन मिळण्याची आशा मावळली असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. मोठ्या कष्टाने उभे केलेले पीक दुष्काळामुळे हातातून जाण्याची वेळ आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.

निमगाव वाघा येथे देवी तलावाची पाहणी करण्यात आली. या तलावाच्या पाण्यावर परिसरातील मोठ्या प्रमाणात शेती अवलंबून आहे. मात्र, तलावात पुरेसा पाणीसाठा नसल्याने यंदा पिके घेणेही कठीण झाले आहे. शेतीसाठी पाणी उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.


नगर तालुक्यातील चास आणि निमगाव वाघा येथे भेट देत दुष्काळी परिस्थितीची पाहणी करताना केंद्रीय पथक, समवेत प्रशासकीय अधिकारी.

### दुष्काळामुळे चारा–पाणी विकत घेण्याची वेळ

दुष्काळामुळे जनावरांसाठी चारा आणि पाणी विकत घेण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला असून, जनावरांच्या चारा–पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणींची गांभीर्याने दखल घ्यावी, तातडीने पंचनामे करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

### पाहणीचा अहवाल लवकरच केंद्र सरकारकडे

शेतकऱ्यांच्या व्यथा आणि प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर पाहणीचा अहवाल लवकरच केंद्र सरकारकडे सादर करण्यात येईल, असे केंद्रीय पथकाकडून सांगण्यात आले. आता या अहवालाच्या आधारे केंद्र सरकारकडून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना किती लवकर मदत मिळते, याकडे नगर तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

या केंद्रीय पथकासमवेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, प्रांताधिकारी सुधीर पाटील तहसीलदार मिलिंद कुलथे, गटविकास अधिकारी अक्षय कारंडे, मंडळाधिकारी प्रताप कळसे, विनायक दीक्षित, चंद्रकांत पानसंबळ, कृषी अधिकारी उस्मान शेख आदी अधिकारी उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### चांगल्या झोपेसाठी

आजच्या धावपळीच्या आणि मोबाईलच्या युगात शांत झोप ही एक मोठी समस्या बनली आहे आणि अनेकजण रात्रभर अंथरुणात तळमळत राहतात. खरंतर चांगली झोप येण्यासाठी आपली दिवसभराची सवय महत्त्वाची असते. सर्वात पहिला नियम म्हणजे रोज एकाच वेळी झोपणे आणि एकाच वेळी उठणे. रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी उशिरा उठण्याची सवय असेल तर शरीराचे नैसर्गिक घड्याळ बिघडते आणि मग आठवडाभर झोपेचा त्रास होतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे झोपण्याच्या एक तास आधी मोबाईल, लॅपटॉप आणि टीव्ही पूर्णपणे लांब ठेवावा कारण त्यातून निघणारा निळा प्रकाश मेंदूला दिवस आहे असा भास करून देतो आणि झोपेचे संप्रेरक तयार होत नाही. त्या वेळेत पुस्तक वाचावे, कुटुंबाशी गप्पा माराव्यात किंवा शांत संगीत ऐकावे. तिसरी गोष्ट म्हणजे रात्रीचे जेवण झोपण्याच्या किमान दोन तास आधी आणि हलके असावे. जास्त तेलकट, तिखट, चहा, कॉफी घेतल्यास पोटात जळजळ होते आणि झोप लागत नाही. झोपण्यापूर्वी एक ग्लास कोमट दूध घेतल्यास झोप शांत लागते. आपली झोपण्याची खोली नेहमी स्वच्छ, अंधारी, शांत आणि थोडी थंड असावी. बेडरूममध्ये कामाचे टेबल किंवा ऑफिसचे काम आणू नये, बेड फक्त झोपेसाठीच वापरावा. यासोबतच दिवसभरात थोडा व्यायाम, सकाळी उन्हात चालणे आणि संध्याकाळी अनुलोम-विलोम, ध्यान केल्यास मनावरचा ताण कमी होतो आणि आपोआप गाढ झोप लागते. जर तुम्ही या सवयी रोज पाळल्या तर तुम्हाला गोळ्या औषधाशिवाय दररोज सात ते आठ तासांची शांत झोप मिळेल आणि सकाळी तुम्ही ताजेतवाने आणि उत्साही उठाल.

## पाककला

### मालपुवा

**साहित्य :** मैदा १ वाटी, रवा १/४ वाटी, साखर १ वाटी, दूध १ वाटी, पाणी १/२ वाटी, बडीशोप पावडर १/४ चमचा, वेलची पावडर १/२ चमचा, तळण्यासाठी तूप किंवा तेल, सजावटीसाठी बारीक चिरलेले पिस्ता आणि बदाम १ चमचा

**कृती :** प्रथम एका भांड्यात मैदा आणि रवा घ्या. त्यात दूध घालून गुठळ्या न होता मिश्रण एकजीव करा. हे मिश्रण २० मिनिटे झाकून ठेवा. तोपर्यंत पाकासाठी एका पातेल्यात साखर आणि पाणी घेऊन एकतारी पाक तयार करा. त्यात वेलची पावडर घाला. आता तयार पिठात बडीशोप पावडर घालून पुन्हा एकजीव करा. कढईत तूप गरम करा. त्यात एक चमचा पीठ टाकून लहान पुरीसारखा मालपुवा सोडा. मध्यम आचेवर दोन्ही बाजूने खरपूस आणि सोनेरी रंग येईपर्यंत तळा. तळलेला मालपुवा लगेच गरम साखरेच्या पाकात २ मिनिटे बुडवून ठेवा. नंतर प्लेटमध्ये काढून वरून पिस्ता-बदाम घालून गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### चाटचे दुकान असेल तर

✻ आपले जर चाट भांडार (पाणीपुरी वगैरेचे) दुकान असेल तर दुकानाचे मुख्य तोंड उत्तर किंवा पूर्व दिशेला असणे सर्वात शुभ मानले जाते. ग्राहक उत्तरेकडून आले की धनलाभ होतो.

✻ दुकानासमोर कचरा, उघडा नाला असू देऊ नका. दरवाजासमोर खांब असेल तर रोज सकाळी हळद-कुंकू लावा आणि लिंबू-मिरची लावा. जड सामान, बटाटे, पीठाची पोती नैऋत्य कोपऱ्यात ठेवावीत.

## सौंदर्य

✻ फोटोत डोळे आकर्षक दिसण्यासाठी काजळा ऐवजी तपकिरी आयलायनर वापरा आणि पापण्यांना मस्कारा लावा.

✻ गालावर जास्त लाल ब्लश लावू नका, पीच किंवा हलका गुलाबी रंग लावा . नाकाच्या शेंड्यावर थोडा हायलायटर लावला की चेहऱ्याला नैसर्गिक चमक येते.

## सल्ला

लोणच्याच्या वर नेहमी २ इंच तेलाचा थर असू द्या, लोणचे उघडे राहिले की बुरशी येते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६

**सर्वपित्री दर्श अमावास्या, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, हस्त २१।४३, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आर्थिक लाभ होईल, जुन्या मित्राची भेट होईल.

**वृषभ :** कामाचा ताण वाढेल, घरात आनंदी वातावरण राहील.

**मिथुन :** प्रवासाचे योग आहेत, नवीन संधी मिळेल.

**कर्क :** पैशांची आवक वाढेल, कुटुंबात वाद होऊ शकतो.

**सिंह :** मान-सन्मान वाढेल, आरोग्याची काळजी घ्यावी लागेल.

**कन्या :** नोकरीत बदल संभवतो, खर्च वाढेल.

**तूळ :** प्रेमात यश मिळेल, व्यवसायात फायदा होईल.

**वृश्चिक :** शत्रूवर विजय मिळेल, कोर्ट-कचेरीत यश मिळेल.

**धनु :** विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला आहे, अचानक धनलाभ होईल.

**मकर :** नातेवाईकांकडून खुशखबर मिळेल, कामे पूर्ण होतील.

**कुंभ :** दिवस धावपळीचा असेल, नवीन ओळखी होतील.

**मीन :** अडकलेले पैसे मिळतील, मन प्रसन्न राहील.

## शब्दगंध क्र. ७५३३

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | | ६ |
| ७ | | | ८ | ■ | | ■ | |
| | ■ | ९ | | १० | | ■ | |
| ■ | ११ | | ■ | १२ | | १३ | |
| १४ | | ■ | १५ | | ■ | | ■ |
| १६ | | १७ | | ■ | १८ | | १९ |
| | ■ | २० | | २१ | ■ | ■ | |
| २२ | | ■ | २३ | | | | |

**आडवे शब्द :-** १) क्षणिक; पातळ; तरळ ४) पंजाबमधील एक प्रमुख नदी ७) फासळी ९) यशस्विता; भरभराट ११) तपास; शोध; ठावठिकाणा; पत्ता १२) आवरण; टरफल; त्वचा १४) ऐकण्याचे इंद्रिय; कण १५) कलम; गोष्ट १६) वेशीवरचा पहारेकरी १८) कुंपणाचा मोठा दरवाजा २०) कमानीखालचा भर २२) कथिल व शिसे यांचा मिश्र धातू २३) 'शेरिफ'चे मराठी रूप

**उभे शब्द :-** १) उत्तर भारतातील एक नदी जिचे खोरे डाकूंसाठी प्रसिद्ध होते २) हेर; खंदक; हाळ ३) घाई; त्वरा; धांदल ५) सात पातालांपैकी एक ६) कोळिष्टक ८) अंकुर; मोड; कोंब १०) कसाई, खाटीक ११) मनातील विचार; मानसिकता १३) रजक; धोबी १४) कपटी; कारस्थानी १५) सामान ज्यात बांधतात ते कापड किंवा गोणपाट १७) ओढा; रोख; झोक १९) पूर्वी हे लोक दारू गाळत असत २१) तमाशातील एक भाग; ओळख; वशिला

### शब्दगंध क्र. ७५३२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| च | ल | न | व | ल | न | ■ | मां |
| हा | ल | त | ■ | ति | र | क | स |
| ■ | ना | ■ | का | का | ■ | ला | ल |
| पा | ■ | सा | ल | ■ | ■ | व | ■ |
| भ | र | धा | व | ■ | व | ती | ने |
| र | ■ | र | ण | गा | डा | ■ | पा |
| ■ | वा | ण | ■ | ज | ■ | मा | ळ |
| वे | ळू | ■ | आ | र | मा | र | ■ |

### फिल्मीचक्कर क्र. १२५७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ब | हा | रों | फू | ल | ■ | रा | जा |
| ■ | ■ | ■ | ल | क्ष्मी | कां | त | ■ |
| दो | औ | र | दो | ■ | ■ | का | ला |
| ब | ■ | ■ | मा | ल | कं | स | ■ |
| द | ■ | कु | ली | ■ | ■ | मा | ■ |
| न | ■ | ■ | ■ | स | ■ | झू | क |
| प्या | सा | सा | व | न | ■ | मे | री |
| र | व | ■ | न | म | क | ■ | ब |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** गर्दीत उभा राहणं सोपं आहे, गर्दीचं कारण बनणं अवघड आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मिरची तिखट लागल्यावर पाणी पिऊनही तिखट का जात नाही?

आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत की तिखट लागल्यावर पाणी पिऊ नये पण का पिऊ नये हे आपल्याला कोणीच नीट सांगत नाही. आज आपण यामागचे खरे कारण अगदी सोप्या भाषेत समजून घेऊया. मिरची तिखट का असते. मिरचीच्या झाडाला स्वतःचे रक्षण करण्यासाठी निसर्गाने एक हत्यार दिले आहे. प्राणी आणि किड्यांनी आपली फळे खाऊ नयेत म्हणून मिरचीच्या आत बियांच्या जवळ एक पांढरा पडदा असतो त्या पडद्यात एक प्रकारचे जळजळीत तेल तयार होते. गावात त्याला झोंबणारे तेल असे म्हणतात. विज्ञानाच्या भाषेत त्याला कॅप्सेसिन म्हणतात पण आपण त्याला तिखट तेल समजूया. हे तेल दिसत नाही पण जिभेला लागताच पेटल्यासारखे वाटते.

आता आपल्या जिभेची रचना कशी आहे. आपल्या जिभेवर आणि तोंडाच्या आत बारीक काट्यासारखे हजारो कण आहेत. त्यांना चव कळणारे कण म्हणतात. या कणांचे काम आहे गोड आंबट खारट ओळखणे आणि मेंदूला सांगणे. पण या तिखट तेलाला हे कण चव म्हणून ओळखत नाहीत. ते याला गरम चटका म्हणून ओळखतात. म्हणजे जेव्हा तुम्ही मिरची खाता तेव्हा तुमच्या मेंदूला वाटते की तुमच्या जिभेवर खरंच विस्तव ठेवला आहे. म्हणून मेंदू लगेच शरीराला थंड करण्याचे आदेश देतो. घाम येणे, नाकातून पाणी येणे, डोळे लाल होणे, कान गरम होणे हे सगळे मेंदूने शरीर थंड करण्यासाठी सुरू केलेले उपाय आहेत. म्हणजे तिखट ही चव नाही तर ती एक गरम जाणीव आहे.

आता मुख्य प्रश्न पाणी का काम करत नाही. तुम्ही कधी दिवा लावण्यासाठी वापरलेले तेल आणि पाणी एकत्र केले आहे का. तेल नेहमी पाण्यावर तरंगते ते कधीच पाण्यात विरघळत नाही. आपले हे तिखट तेल देखील असेच आहे. ते पाण्यात विरघळत नाही. जेव्हा तुम्ही पाणी पिता तेव्हा पाणी त्या तेलाला धुऊन न टाकता त्या तेलाला ढकलते. जसे फरशीवर पडलेले तेल तुम्ही पाण्याने धुतले तर ते आणखी पसरते अगदी तसेच तोंडात होते. जिभेच्या एका कोपऱ्यात असलेले तिखट तेल पाणी प्यायल्यामुळे घशापर्यंत, ओठांवर, गालाच्या आत सगळीकडे पसरते. म्हणून एका घोट पाण्याने दोन क्षण बरे वाटले तरी पुढच्या क्षणी जास्त आग होते. मग शेतकरी आणि जुन्या बायका यावर काय उपाय करायच्या. त्यांचा उपाय आजच्या मोठ्या डॉक्टरांच्या उपायापेक्षा भारी होता. त्या कधीच पाणी देत नसत. पहिला उपाय दूध दही ताक. दुधात नैसर्गिक चरबी असते आणि साय असते. चरबीचे काम आहे तेलाला स्वतःमध्ये विरघळवणे. जसे कपड्यावर पडलेला तेलाचा डाग साबणाने जातो तसे दुधातील चरबी जिभेवर चिकटलेले तिखट तेल स्वच्छ पुसून काढते. म्हणून तिखट लागल्यावर थंड दुधाचा घोट किंवा दह्याचा चमचा हा अमृतासारखा काम करतो. ताक तर आणखी चांगले कारण ते थंडही असते आणि आंबटही असते.

दुसरा उपाय कोरडा घास. जर घरात दूध नसेल तर भाकरीचा पोळीचा किंवा भाताचा मोठा घास चावून चावून खा. तो घास कागदाप्रमाणे काम करतो आणि जिभेवरचे तेल शोषून घेतो. म्हणूनच तिखट भाजी बरोबर पोळी खाल्ली की तिखट कमी लागते. तिसरा उपाय गोड पदार्थ. साखर गूळ मध हे पदार्थ तिखटपणाला दुसरीकडे वळवतात. जिभेवर गोड चव आली की मेंदू तिखटाचा संदेश विसरतो आणि गोडकडे लक्ष देतो. म्हणून साखर तोंडात ठेवल्यावर लगेच बरे वाटते.चौथा उपाय तेल किंवा तूप. थोडेसे तूप जिभेवर फिरवले की तूप त्या तिखट तेलाला स्वतःमध्ये मिसळून घेते आणि घशातून खाली घेऊन जाते. म्हणून पुढच्या वेळी लक्षात ठेवा. तिखट लागणे म्हणजे तोंडात तेल सांडणे आहे आणि तेल पाण्याने कधीच जात नाही. पाण्याने फक्त ते पसरते. त्याला पुसण्यासाठी दुधासारखा किंवा भातासारखा पदार्थ हवा. हा आहे आपल्या आजीच्या बटव्यातील अनुभव आणि त्यामागचे खरे शास्त्र.

## दोन गावांची गोष्ट

एका जंगलाच्या कडेला दोन गावे होती. एका गावाचे नाव होते निर्मळ गाव आणि दुसऱ्या गावाचे नाव होते धुरके गाव. निर्मळ गावातील लोक खूप समजदार होते. ते झाडे लावायचे, नदीचे पाणी स्वच्छ ठेवायचे, घरातील कचरा एका ठिकाणी जमा करायचे आणि बैलगाडीचा वापर करायचे. त्यांच्या गावातील हवा थंड होती आणि पाणी गोड होते. त्या गावातील मुले आजारी पडत नसत. धुरके गावातील लोक आळशी आणि हलगर्जी होते. ते आपला सगळा कचरा नदीत टाकायचे. कारखान्याचा धूर आकाशात सोडायचे. झाडे तोडून विकायचे. त्यांना वाटायचे याने आपले गाव श्रीमंत होईल. हळूहळू त्यांच्या गावातील हवा काळी झाली. नदीचे पाणी काळे झाले. झाडे नष्ट झाल्यामुळे पाऊस येईनासा झाला. गावातील लोकांना खोकला, ताप आणि श्वासाचे आजार सुरू झाले.

एकदा दोन्ही गावात मोठी जत्रा भरली. निर्मळ गावातील लोक आनंदी आणि निरोगी दिसत होते तर धुरके गावातील लोक आजारी आणि दुःखी दिसत होते. तेव्हा धुरके गावच्या प्रमुखाला आपली चूक कळली. तो निर्मळ गावच्या प्रमुखाकडे गेला आणि म्हणाला आम्हाला माफ करा आम्ही निसर्गाला विसरलो. निर्मळ गावच्या प्रमुखाने त्याला समजावले की निसर्ग हा आपला दाता आहे. त्याला जपले तर तो आपल्याला जपतो. त्यानंतर दोन्ही गावातील लोकांनी मिळून पुन्हा झाडे लावली नदी स्वच्छ केली आणि गाव स्वच्छ ठेवण्याची शपथ घेतली. काही महिन्यांतच धुरके गाव पुन्हा सुंदर झाले.

बोध - प्रदूषणाने विनाश होतो आणि स्वच्छतेने जीवन फुलते. निसर्गाचे संरक्षण हेच आपले खरे रक्षण आहे.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

वाटते आणि जे काही मिळत नाही त्याची खंत वाटत नाही. आम्हाला जे काही मिळते ते परमेश्वराचे आहे अशा कृतज्ञतेच्या जाणीवेने जग काही आमचे आहे ते आम्हाला कर्जाऊ मिळालेली देणगीच आहे. जेव्हा ह्या कर्जफेडीची वेळ येते तेव्हा आम्ही परमेश्वराचे आभार मानतो व ती गोष्ट सोडून नशीबाला दोष देत नाही. जे काही मिळेल ते मोठ्या राजीखुशीने व कृतज्ञ: स्वीकारतो. आत्मा अशाच परिस्थितीत राहतो.एकदा राबिया बसरीचा मित्र त्यांना भेटावयास आला. त्याच्या डोक्यावर कापडाची पट्टी बांधलेली होती व तो डोकेदुखीची तक्रार करीत होता. बसरींनी त्याला विचारले, किती दिवसापासून आपले डोके दुखत आहे? मित्राने उत्तर दिले काही वेळापासून! (काही तासांपासून) बसरींनी विचारले,

किती दिवस आपण डोकेदुखीपासून मुक्त होता? त्याचे उत्तर होते, पुष्कळ वर्षांपासून. राबियांनी म्हटले, काही तासांपासून आपले डोके दुखत असल्याने डोक्यावर तक्रारीची पट्टी बांधली. परंतु कित्येक वर्षे आपण डोकेदुखी पासून मुक्त होता. त्याबद्दल परमेश्वराचे आभार प्रदर्शन करणारी पट्टी का बांधली नाही? ह्याचाच अर्थ असा की, ठेविले अनंती तैसेचि रहावे!

जेव्हा आमचा आत्मा जागृत होतो तेव्हा आम्ही वैराग्य भावनेने राहतो. जर आम्ही ह्या जगातील क्षणैक मोह-बंधनात न अडकता जीवन जगलो तर आम्ही खऱ्या अर्थाने पूर्णतः स्वतंत्र होतो. कोणतीही वस्तु हिरावली जाण्याची आम्हाला भीती नसते व अंतरीय खजिन्याची मनमुराद मौज घेतो.अहंकार आमच्या आत्म्यावर आवरण कशी टाकतो ? असे म्हटले जाते की आत्मोन्नतीच्या मार्गावरील शेवटचा अडथळा अहंकार होय. अहंकार उघड उघड दिसतो तसा लपून छपूनही राहतो. हिंदु धर्माच्या श्रीमतभगवत गीतेत म्हटले आहे की,''सर्व घमंड आणि ईर्ष्याचा त्याग कर. मी आणि माझे चे सर्व विचार सोड.

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

शकतच नाही. चला, आता आपल्या म्हणण्यावर परत येऊ या. प्रत्येकाची आवड आणि मतं वेगळी असतात असं मानू या. जर अंतरदर्श आणि कपडे यांमध्ये आपली आवड इतकी वेगळी असेल तर आपली विचारपद्धती वेगळी असणार नाही का? सुरेश ओबेरॉय : नक्कीच वेगळी असेल.

शिवानीदीदी : याचं कारण आपली आवड आणि विचार आपल्या संस्कारांवर आधारित आहे, जे वेगवेगळे आहेत.

प्रत्येकाला स्वतःचं मत असण्याचा हक्क आहे. इतरांना जरी आपली आवड नामंजूर असली तरीही आपण त्या बाबत ठाम असायला हवं. नाही तर आपण इतरांना आपल्या न कळत संदेश देतो की, त्यांनी माझ्याशी खोटं बोलावं आणि माझ्या आवडीच्या बाजूने मत द्यावं, कारण आपल्याकडे सत्य ऐकण्याची ताकद नाहीये. स्वत:ला छान वाटावं म्हणून आपण त्यांचं खोटं स्वीकारतो. अशा प्रकारे, खोट्यावर आपण आपल्या स्वाभिमानाचा पाया रचत आहोत. इतर लोकांना आपण जितके आवडतो त्यानुसारच आपण आपल्याला आवडतो या गोष्टीवर हा पाया आधारित असतो.

सुरेश ओबेरॉय : याचा अर्थ आपण स्वत:ला ओळखत नाही असा होतो का ?

शिवानीदीदी : आपण फक्त स्वतःवर विश्वास ठेवत नाही. स्वतःला ओळखणं हा खूप खोल विषय आहे. पण आज आपण आपल्याच आवडीनिवडींबाबत ठाम नाही आहोत.

सुरेश ओबेरॉय : पण इतरांचं मत विचारण्यात काय चुकीचं आहे? उदाहरणार्थ, नवीन गाडी घेण्याआधी मी कदाचित माझ्या ड्रायव्हरचं मत घेईन.

शिवानीदीदी : इथे तुम्ही सल्ला मागत आहात आणि हे आपण नेहमीच करतो. इथे आपण घेतलेल्या निर्णयाबद्दल बोलत आहोत. समजा, तुम्ही आयुष्यात एक निर्णय घेतला ज्याला इतर कोणाचीच मंजुरी मिळाली नाही. सुरेश ओबेरॉय : पण मी तो निर्णय घेण्यामागे काहीतरी कारण असेल.

शिवानीदीदी : हो, घेतलेल्या निर्णयाबाबत तुम्ही सहज असाल, तुम्हाला ते आवडत असेल आणि त्यामुळे कोणीही दुखावलं जाणार नसेल, तर मग तुम्हाला तो निर्णय घ्यायचा पूर्ण अधिकार आहे.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

भाऊजी : तुझ्या ताईला सांगू नकोस मी बाहेर जेवलोय म्हणून

मेहुणी : १०० रुपये द्या, नाहीतर सांगते!

भाऊजी : तू तर तुझ्या बहिणीपेक्षाही डेंजर निघालीस!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारताचे पहिले उपराष्ट्रपती कोण?

– डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

तपासणी केली असता बाळाचे वजन सहाशे ग्रॅम होते. सर्व डॉक्टरांनी व मी देखील तिचे गर्भपात करून घेऊ असा नातेवाईकांना सल्ला दिला; परंतु रुग्णाचे नातेवाईक गर्भपात करून घेण्यास तयार नव्हते. शेवटी मी त्यांना पुणे येथे मोठ्या रुग्णालयामध्ये जाण्याचा सल्ला दिला. तेही लगेचच पुण्याला गेले; परंतु तेथील डॉक्टरांनीसुद्धा बाळ एकदम कोरडे आहे. अशा अवस्थेमध्ये बाळ जगू शकणार नाही म्हणून तुम्ही गर्भपात करून घ्या हाच सल्ला दिला. ते ऐकून ते परत आमच्या रुग्णालयामध्ये उपचार घेण्यास आले. ङ्गङ्गडॉक्टर, काही करा; परंतु आमचे हे बाळ वाचवाङ्कङ्क असे ते सारखे म्हणत होते.

मलाही बाळ वाचेल याबद्दल अजिबातच खात्री नव्हती; परंतु तशी त्यांना कल्पना देऊन तिला रुग्णालयामध्ये दाखल करून घेतले व उपचार सुरू केले. आहारामध्ये नारळाचे पाणी, गहू रोपस, आयुर्वेदिक मासानुमासिक औषधे, मोड आलेली कडधान्ये, पालेभाज्या सुरू केल्या. तिला मंत्रोपचारामधील सर्व मंत्र दिवसातून एकदा म्हणण्यास अपत्यप्राप्तीमुळे त्या दांपत्याला व नातेवाईकांना खूप आनंद झाला. दुर्वांकुर पंचकर्म सेंटरमध्ये त्यांना संततिसुख मिळाल्यामुळे त्यांनी मुलीचे नाव दुर्वा व मुलाचे नाव अंकुर असे ठेवले. अशा प्रकारे आजपर्यंत अनेक दांपत्यांना वारंवार गर्भपात होणाऱ्या केसेसमध्ये आयुर्वेद व आधुनिक उपचाराने संततिसुखाचा आनंद देण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत.ऑक्टोबर २०१० मध्ये कराडवरून एक दांपत्य लग्नाला पाच वर्षे होऊनही गर्भधारणा होत नाही, म्हणून तपासणीसाठी आले होते. बऱ्याच ठिकाणी मोठे-मोठे महागडे उपचार करूनही संततीसुख मिळाले नव्हते.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# एस.जी.कायगांवकर ज्वेलर्समध्ये नवरात्रीची विशेष बक्षीस योजना

**घटस्थापना ते विजयादशमीपर्यंत दररोज जिंका आपट्याची सोन्याची पाने**

नगर – तब्बल ८९ वर्षांची विश्वसनीय सुवर्ण सेवेची परंपरा असलेल्या नगरमधील एस.जी.कायगांवकर ज्वेलर्स दालनात खास नवरात्रीनिमित्त आकर्षक बक्षिस योजना जाहीर करण्यात आली आहे. ११ ऑक्टोबर रोजी घटस्थापनेपासून या दालनात दररोज भाग्यवान ग्राहकांना लकी ड्रॉ व्दारे सोन्याच्या आपट्यांच्या पानांची भेट मिळणार आहे. नवरात्रातील पहिल्या माळेला एक सोन्याचे पान, दुसऱ्या माळेला दोन, तिसऱ्या माळेला तीन याप्रमाणे विजयादशमीपर्यंत (२० ऑक्टोबर) सोन्याची तब्बल ५५ आपट्यांची सोन्याची पाने ग्राहकांना बक्षीस रुपात मिळणार आहेत. नवरात्र, दसऱ्याच्या मुहूर्तावरील खरेदीचा आनंद व्दिगुणित करून अनोखी भेट देणारी ही योजना ग्राहकांसाठी पर्वणी ठरणार आहे, अशी माहिती संचालक सुभाष कायगांवकर यांनी दिली.




ज्वेलर्सच्या नगर शहरातील सराफ बाजार व सावेडी रस्त्यावरील प्रशस्त दालनात ही योजना सुरू आहे. 'दसरा सण मोठा, नाही आंनदाला तोटा' असे म्हटले जाते. भारतीय संस्कृतीत अतिशय शुभ मुहूर्त मानल्या जाणाऱ्या दसऱ्याच्या मुहूर्तावर सुवर्ण खरेदीला अतिशय महत्त्व असते. सोन्याच्या दागिन्यांची मौल्यवान खरेदी या काळात आवर्जून केली जाते. संपन्नता, सुबत्तेचे प्रतिक असलेले सोने चांदी, डायमंड खरेदी करण्यासाठी ग्राहकांची पहिली पसंती एस.जी.कायगांवकर ज्वेलर्स दालनाला असते. सुवर्ण व्यवसायात ग्राहकांचा विश्वास व त्यांच्याशी आपुलकीचा संवाद महत्त्वाचा असतो. ८९ वर्षांची परंपरा असलेल्या या दालनाने अशीच विनम्र व सोन्यासारखी सेवा देवून असंख्य ग्राहकांच्या ह्दयात स्थान मिळवले आहे. ग्राहकांशी असलेले ऋणानुबंध आणखी घट्ट करण्यासाठी या दालनात प्रसंगानुरुप अनेक योजना राबविण्यात येतात.

सोन्याच्या दागिन्यांची नाविन्यपूर्ण व्हरायटी देण्यावर या दालनाचा कायम भर असतो. महिलांना चोखंदळपणे आपल्या मनातील दागिना हव्या त्या डिझाईनमध्ये या ठिकाणी मिळतोच. सोन्याच्या दागिन्यांबरोबरच प्लॅटिनम, डायमंड, हिऱ्याच्या दागिन्यांकडे ग्राहकांचा कल असतो. सावेडीतील दालनामध्ये डायमंडचा स्वतंत्र काउंटर आहे. याठिकाणी ग्राहकांना मागणीनुसार दागिने उपलब्ध करून दिले जातात.

ज्वेलर्सने सध्याच्या डिजिटल युगाचे महत्त्व ओळखून काही वर्षांपूर्वी 'एसजीके ई-गोल्ड' हे मोबाईल अॅप सुरु केले. या अॅपमुळे ग्राहक अगदी २४ बाय ७ घरबसल्या २४ कॅरेट सोने तसेच शुध्द चांदी खरेदी करू शकतात. या अॅपला देशभरातून प्रतिसाद मिळत आहे. आता याच एसजीके ई गोल्ड अॅपव्दारे ग्राहक २२ कॅरेट शुद्ध सोन्याचीही खरेदी करता येत आहे. किमान १ हजार रुपयांच्या पटीत डिजिटल स्वरुपात २२ कॅरेट सोन्याची खरेदी करता येते. भारतात प्रथमच २२ कॅरेट सोने खरेदी डिजिटल अॅपव्दारे करण्याची सुविधा एसजीके ई गोल्ड अॅपव्दारे उपलब्ध झाली आहे. नियमित बचतीतून सुरक्षित व भविष्यात उपयोगी ठरणारी सोने खरेदीची सुवर्णसंधी या एसजीके ई गोल्ड अॅपमुळे उपलब्ध होत आहे.

खास एस.जी.कायगांवकर ज्वेलर्स दालनाचा ठसा असलेले कलाकुसरीचे सुवर्णालंकार खरेदी नवरात्रात निवांतपणे करता येते. यासाठी दोन्ही दालनांमध्ये विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या खरेदीबरोबरच सोन्याची आपट्यांची पाने जिंकण्याची संधी ग्राहकांना मिळाली आहे. ग्राहकांनी दालनात दागिने खरेदी करून बक्षिस योजनेत सहभागी होण्याचे आवाहन सागर कायगांवकर यांनी केले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## चंदनाचा आदर्श

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




कोणी एक बिचारा. त्याच्यावर तापाचा मारा. खूप चढला ताप. जिवाला लागली धाप. अंग पोळायला लागले. अंगाचा दाह असह्य झाला, पण चंदन झाले पुढे. उगाळले ते दगडावर काढले त्याने भरपूर गंध. माखले ते अंगाला. चंदन खूप झिजले, पण दाह शांत करून गेले. चंदनाचे मन खूप सुखावले. रोग्याचे अंग तापमुक्त झाले.

रामदासस्वामी म्हणतात, मना, तू या चंदनाचा आदर्श समोर ठेव. सज्जनांना होणारा त्रास आणि ताप घालवायला पुढे हो. स्वतः कष्ट कर, सज्जनांना संतुष्ट कर.

मना चंदनाचे परी त्वा झिजावे
तरी अंतरी सज्जना नीववावे ।।

एकदा सूर्य खूप तापला. जगाला चटके देऊ लागला. चंद्र तर त्या तापाने भाजून निघाला. वाळूदेखील पोळून बेजार झाली. चंद्राने विचार केला, पृथ्वीवरच्या माणसाला हे चटके नकोत बसायला. त्याने सुर्याच गळी उष्णता स्वतःच पचवली. अंगाची लाही लाही झाली. ती आनंदान सहन केली आणि आल्हादकारक शीतल प्रकाशकिरणे माणसासाठी पृथ्वीवर सोडली.

वाळूदेखील पोळली होती. खूप गरम झाली होती. अगदी धगधगत्या निखाऱ्यासारखी. तिने विचार केला, मीच का एकटी हे दुःख सहन करू? पृथ्वीवरच्या माणसाला. माझ्या संगतीला, माझ्या आधारे रस्त्याने चालणाऱ्या माणसाला मात्र हे चटके बसू नये ? सूर्य माणसाला ताप देतो, पण चंद्र तो ताप घालवतो. माणूस हसून खेळून काळ घालवतो. मी मात्र नुसती होरपळते. माणसालाही कळू देत माझं दुःख. पोळू देत त्याचे पाय. दोघंही दुःखी, तर मला मिळेल मनाला थोडीतरी शांती. ती दुष्टासारखी मनात हसली. खूपशी सुखावली. माणूस आला. त्याच्या तळपायाला ती तापलेली वाळू असह्य चटके देऊन गेली. माणसाची आग आग झाली.

समुद्राने चंद्राची रीत पाहिली. वाळूची दुष्ट मती जाणली. त्याला आली भरती. प्रेमाने त्याने आलिंगले आकाशतल्या चंद्राला आणि लाटांचा मार देऊन वाळूला फेकली दूर. आपटली किनाऱ्याला.

एक संस्कृत कवी म्हणतो, दुसऱ्यावर मुळीही उपकार न करणाऱ्या, उलट इतरांना ताप देणाऱ्या माणसा, तुझ्यापेक्षा गवत बरं. स्वतः घास बनून जनावरांना जीवन देतं. रणांगणातून जीव घेऊन पळणाऱ्या जखमी वीराला आपल्या भाऱ्यात लपवंत. म्हणून दुसऱ्यासाठी झिजावे, मनी संतोषावे, ईश्वरप्रसादाने पावावे, माणसाने.

**– किशोर गांधी**

# तिळवण तेली समाज ट्रस्टच्या दाळमंडई येथील मंदिरात शारदीय नवरात्र उत्सवनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन



नगर – अहिल्यानगरच्या दाळमंडई येथील तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने शारदीय नवरात्र उत्सव निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ट्रस्टच्या अध्यक्षा निता लोखंडे यांनी दिली.

या शारदीय नवरात्र निमित्त ११ ऑक्टोबर रोजी दु. १२ वा. घटस्थापना, १२ ऑक्टोबर रोजी स.दैनंदिन पुजा व संध्याकाळी ७.३० आरती, १३ ऑक्टोबर रोजी दु.३ वा. श्री देवीची नित्योपचार महापुजा- कुंकुमार्चन कार्यक्रम, १४ ऑक्टोबर रोजी श्री देवीची नित्योपचार महापुजा-आरती, १५ ऑक्टोबर रोजी श्री देवीची नित्यपूजा-ललित पंचमी -दुपारी ३ वाजता दुर्गा भजनी मंडळाचा कार्यक्रम, १६ ऑक्टोबर रोजी श्री देवीची नित्यपूजा दुपारी ४ वाजता सप्तपदी पाठ, १७ ऑक्टोबर रोजी श्री देवीची नित्यपूजा, रात्री ७ वाजता श्री तुळजापुरच्या तुळाजाभवानी पालखी मिरवणुक व पालखी आगमन १८ ऑक्टोबर रोजी श्री देवीची नित्यपूजा १९ ऑक्टोबर रोजी दुर्गाष्टमी श्री देवीची नित्योपचार महापूजा आरती आणि दुपारी ७.३० वाजता वैदिक होमास प्रारंभआणि सकाळी ७ वा ३० मि. पूर्णाहुती कुमारिका पूजन रात्री ८ वाजता २० ऑक्टोबर रोजी विजयादशमी (दसरा) श्री देविची नित्योपचार महापूजा, संध्या. ७ वा. सिमोलंघन मंदिराभोवती पालखी मिरवणूक व मंचकी निद्री असे कार्यक्रम होतील.

तसेच दररोज दु.४ वाजता श्री सरस्वती भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम, दररोज संध्याकाळी देवीची संबळ वादनावर आरती होणार आहे. तसेच ९ दिवस देवीची विविध रुपे साकरण्यात येणार आहे. तरी या शारदीय नवरात्र उत्सावानिमित्त आयोजित कार्यक्रमांचा भाविकांनी उपस्थित रहण्याचे आवाहन उपाध्यक्षा शोभना धारक यांनी केले आहे.

नवरात्र उत्सव यशस्वीतेसाठी ट्रस्टच्या अध्यक्षा सौ. निता लोखंडे, उपाध्यक्षा सौ. शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, खजिनदार प्रकाश सैंदर, विश्वस्त प्रसाद शिंदे, मनोज क्षिरसागर, सागर काळे, दत्तात्रय डोळसे, गोकुळ कोटकर आदी प्रयत्नशिल आहे. सर्व कार्यक्रम तिळवण तेली समाज ट्रस्टच्या श्री संताजी भवन, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, तेली पंचाचा वाडा, दाळमंडई येथील होतील.

# शारदा व ज्ञानेश्वर वाद करंडक वाद स्पर्धा प्रभावी वक्ते घडवणारी स्पर्धा

**मधुसूदन सारडा यांचे प्रतिपादन; सारडा महाविद्यालयाच्या शारदा व ज्ञानेश्वर करंडक वाद स्पर्धेस प्रतिसाद**

नगर – प्रेमराज सारडा महाविद्यालयात गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे शारदा व ज्ञानेश्वर करंडक वाद स्पर्धेचे आयोजन करून गौरवशाली परंपरा जपली जात आहे. ही स्पर्धा पूर्ण राज्यात नावाजलेली असल्याने या स्पर्धेला दरवर्षी मिळणारा प्रतिसाद वाढत आहे. वक्ता दशसहस्रेषु याप्रमाणे विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व खुलवण्या बरोबरच ही स्पर्धा उद्याचे प्रभावी वक्ते घडवणारी आहे, असे प्रतिपादन सारडा महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा यांनी केले.



प्रेमराज सारडा महाविद्यालयाच्या शारदा व ज्ञानेश्वर वाद करंडक स्पर्धेचे उद्घाटन करताना सारडा महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा व प्रमुख पाहुण्या प्रा.ज्योती कुलकर्णी. समवेत महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य मिलिंद देशपांडे व प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक सुजित कुमावत व परीक्षक.

प्रेमराज सारडा महाविद्यालयात आयोजित शारदा व ज्ञानेश्वर करंडक वाद स्पर्धेचे उद्घाटन सारडा महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा व प्रमुख पाहुण्या संस्थेच्या उपकार्याध्यक्षा प्रा.ज्योती कुलकर्णी यांच्या हस्ते शारदादेवी व संत ज्ञानेश्वर माउलींच्या चांदीच्या करंडकांच्या पूजनाने झाले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य मिलिंद देशपांडे व प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक सुजित कुमावत, परीक्षक प्रा.वैशाली आहेर, प्रा.महेबूब सय्यद, प्रा.कैलास महाले, प्रा.पांडुरंग वाघमारे, प्रा.संदीप कुसळकर व प्रा. क्षितिजा हडप आदी उपस्थित होते. या राज्यस्तरीय स्पर्धेला राज्यातील विविध महाविद्यालयांच्या संघांचा प्रतिसाद मिळाला.

प्रा.ज्योती कुलकर्णी म्हणाल्या, मोठी वैभवशाली परंपरा लाभलेली ही स्पर्धा दरवर्षी मिळणाऱ्या प्रतिसादामुळे मोठ्या वेगाने पुढे जात आहे. अनेक दिग्गज कलाकारांनी या स्पर्धेत करंडक पटकावून जीवनात यशस्वी झाले आहे. म्हणूनच ही स्पर्धा राज्यात नवजात आहे.

प्रास्ताविकात प्राचार्य माहेश्वरी गावित म्हणाल्या, गेल्या अनेक वर्षांपासून अखंडितपणे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्वाला पैलू पडणाऱ्या या स्पर्धेचे आयोजन सारडा महाविद्यालय करत आहे. विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणारे ज्वलंत विषयांवर या स्पर्धेत घमासान चर्चा होत आहेत. त्यामुळेच झेन झी पिढीचा उत्स्फूर्त प्रतिसाद या स्पर्धेला मिळत आहे.

स्पर्धेचे निमंत्रक प्रा.माणिक रासने यांनी स्वागत केले व निमंत्रक डॉ.राहुल पंडित यांनी आभार मानले. प्रा. मानसी केळकर सूत्रसंचालन केले.

# नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थानात नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी

**भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांकडून पाहणी आरोग्य शिबिर, रक्तदानासह विविध धार्मिक-सामाजिक उपक्रम**

नगर – एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी देवस्थान ट्रस्टकडून जय्यत तयारी करण्यात आली

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरातील कायदा व सुव्यवस्था तसेच भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी मंदिराची पाहणी केली. यावेळी पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि ट्रस्टचे विश्वस्त यांची बैठक घेण्यात आली. या ट्रस्टच्या वतीने नवरात्रोत्सव काळात भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांची माहिती पोलिसांना देण्यात आली. भाविकांची गर्दी, वाहतूक व्यवस्था, मंदिर परिसरातील शिस्त, सुरक्षितता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक त्या बंदोबस्ताबाबत पोलिस अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.





नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरातील कायदा व सुव्यवस्था तसेच भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी मंदिराची पाहणी केली.

दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक येत असल्याने गर्दीचे नियोजन, वाहनांची ये-जा आणि भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येणार आहे. यासाठी देवस्थान ट्रस्ट आणि पोलिस प्रशासन यांच्यात समन्वय ठेवण्यावर बैठकीत भर देण्यात आला. नवरात्रोत्सवाची सुरुवात ११ ऑक्टोबर रोजी सकाळी देवीची मिरवणूक काढून प्राणप्रतिष्ठापना करण्याने होणार आहे. या धार्मिक सोहळ्यासाठी भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

नवरात्रोत्सवाच्या कालावधीत विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, होमहवन, आकर्षक विद्युत रोषणाई, देवीचा गोंधळ तसेच महाप्रसाद आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. भाविकांना दर्शनासाठी येताना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी ट्रस्टच्या माध्यमातून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या बैठकीस ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर आदी उपस्थित होते.

# भिंगारमध्ये १३ ऑक्टोबरला रंगणार शाहिरांचा कलगीतुरा

नगर – भिंगार येथे सालाबादप्रमाणे शारदीय नवरात्र उत्सव आणि आई जगदंबेच्या पालखी-पलंग भेटीनिमित्त तिसऱ्या माळेला १३ ऑक्टोबर रोजी शाहिरांच्या पारंपरिक कलगीतुऱ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. भिंगार येथील सरपण गल्लीमध्ये रात्री ८.३० वाजता हा कार्यक्रम रंगणार आहे.

सुमारे ३५० वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेल्या या कलगीतुऱ्याच्या कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा जपला जातो. शाहिरांच्या सवाल-जवाबांनी, काव्यात्मक सादरीकरणाने आणि लोककलेच्या रंगतदार आविष्काराने हा मेळा रसिकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. या पारंपरिक लोककला सोहळ्याला महाराष्ट्रातील शाहिरांनी तसेच लोककलेवर प्रेम करणाऱ्या रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कलगीतुरा मंडळाचे अध्यक्ष भाऊ कर्डिले यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद, पाणी व स्वच्छता विभाग अहिल्यानगर मार्फत 'नवरात्री - स्वच्छता उत्सव' राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण उपक्रम




नगर – शारदीय नवरात्रौत्सव ११ ते २० ऑक्टोबर या कालावधीत साजरा होत आहे. नवरात्र काळात ग्रामीण भागात महिला, युवती, बचत गट, अंगणवाडी व शाळांमधील विद्यार्थिनी एकत्र येतात. या गर्दीच्या संधीचा उपयोग स्वच्छता, आरोग्य व पर्यावरण जनजागृतीसाठी व्हावा, या उद्देशाने जिल्हा परिषद, पाणी व स्वच्छता विभाग अहिल्यानगर मार्फत 'नवरात्री – स्वच्छता उत्सव' हा राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

जि.प. अहिल्यानगर मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या निर्देशानुसार प्रकल्प संचालक, जल जीवन मिशन यांनी सर्व गट विकास अधिकारी यांना आदेश जारी केले आहेत. सदर उपक्रमांतर्गत तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीत खालील ९ स्पर्धांचे आयोजन करणे बंधनकारक राहील.

उपक्रमाचा मुख्य उद्देश : १) नवरात्र मंडप व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचा संदेश देणे., २) महिलांमध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ बाबत जागरूकता., ३) प्लास्टिक मुक्त उत्सव साजरा करणे., ४) युवती व बचत गटांचा स्वच्छतेत सक्रिय सहभाग.

स्पर्धांचा सविस्तर तपशील : १) स्वच्छता रांगोळी स्पर्धा : देवीच्या आवतारात स्वच्छता संदेश देणारी रांगोळी. साहित्य – फुलं, हळद-कुंकू, ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट., २) कचऱ्यापासून टिकाऊ सजावट (Best from Waste): टाकाऊ वस्तूंपासून देवीच्या मखराची व तोरणाची सजावट. ३) देवीचा पोशाख – पुनर्वापर थीम : जुन्या साड्या, वर्तमानपत्र, कापडाचा पुनर्वापर करून देवीचा पोशाख., ४) स्वच्छता प्रश्नमंजुषा : बचत गट व विद्यार्थिनींसाठी SBM, ODF Plus, घनकचरा नियमावर Quiz., ५) स्वच्छ मंडप व दांडिया स्पर्धा : ज्या मंडपात कचरा पेटी, ४ प्रकारात कचरा वर्गीकरण व स्वच्छता असेल त्याला पुरस्कार., ६) स्वच्छ घर, स्वच्छ अंगण स्पर्धा : गावातील १० घरांची निवड, घर व अंगण स्वच्छता तपासणी., ७) प्लास्टिक मुक्त घटस्थापना : घटस्थापना व प्रसादासाठी प्लास्टिकचा वापर टाळणाऱ्या मंडळांना सन्मान., ८) सेल्फी विथ स्वच्छता पॉईंट : स्वच्छता कॉर्नर तयार करून सेल्फी स्पर्धा, SwachhNavratri हॅशटॅग., ९) स्वच्छता क्वीन स्पर्धा : ग्रामीण भागातील घनकचरा नियम २०२६ अंतर्गत घरात निर्माण होणारा कचरा ४ प्रकारात (ओला, सुका, घरगुती घातक, सॅनिटरी) वेगळा करेल व शेजारच्या दहा कुटुंबांना कचरा वर्गीकरणासाठी प्रोत्साहीत करेल अशा महिलांचा ग्रामपंचायत वतीने 'स्वच्छता क्वीन' म्हणून प्रमाणपत्र अथवा पारितोषिक देऊन सन्मान करावा.

सदर उपक्रमात गावस्तरीय भजनी मंडळ, नवरात्र मित्र मंडळ, तरुण मंडळ, महिला बचत गट व गावातील नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन राजेंद्र देसले प्रकल्प संचालक जलजीवन यांनी केले आहे.

# साखर कामगारांचा २२ ऑक्टोबरपासून बेमुदत संप

**बी आय आर कायदा पूर्ववत करण्यासह थकीत वेतन, बंद कारखाने सुरू करण्याची मागणी**

नगर – महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघ आणि महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ या दोन्ही राज्यव्यापी मान्यताप्राप्त व प्रातिनिधिक संघटनांनी राज्यातील साखर व जोडधंद्यातील कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी २२ ऑक्टोबर पासून बेमुदत संप पुकारण्याचा निर्णय घेतला आहे. मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास २२ ऑक्टोबर रोजी पहिल्या पाळीपासून महाराष्ट्रातील साखर व जोडधंद्यातील कामगार-कर्मचारी काम बंद आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष कॉम्रेड पी. के. मुडे व सरचिटणीस कॉम्रेड आनंद वायकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे.



आनंद वायकर



पी. के. मुडे

साखर उद्योगातील कामगारांच्या वेतनवाढीसंदर्भात महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या त्रिपक्ष समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने मालक प्रतिनिधी आणि कामगार प्रतिनिधी यांच्यात २३ जुलै २०२५ रोजी करार करण्यात आला होता. या कराराची अंमलबजावणी करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, खाणीकर्म विभागाने शासन निर्णय मंत्रालय, मुंबई यांच्या माध्यमातून २४ ऑक्टोबर २०२५ रोजी परिपत्रक प्रसिद्ध केले होते. त्यानुसार राज्यातील अनेक साखर कारखान्यांनी सदर कराराची अंमलबजावणी सुरू केली आहे. महाराष्ट्र शासन आणि साखर कामगार संघटनांमध्ये त्रिपक्ष समितीमार्फत १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२९ अखेरचा करार अस्तित्वात असून, हा करार महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ अन्वये करण्यात आलेला असल्याचे संघटनांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रातील साखर कामगार तसेच जोडधंद्यातील कामगारांच्या हक्कांशी संबंधित महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ अर्थात बीआयआर कायदा शासनाने रद्द केला आहे. त्यामुळे साखर व जोडधंद्यात कार्यरत असलेल्या सुमारे दोन ते अडीच लाख कामगारांना न्याय्य हक्कांपासून वंचित राहावे लागण्याची शक्यता असल्याने कामगारांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला असल्याचे संघटनांनी म्हटले आहे.

राज्यातील साखर कामगारांचे एक हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक थकीत वेतन असल्याचा दावा संघटनांनी केला आहे. त्याचबरोबर अनेक साखर कारखाने अनेक वर्षांपासून बंद अथवा आजारी अवस्थेत आहेत. या कारखान्यांमधील कामगारांच्या रोजीरोटीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. साखर कारखान्यांमध्ये रोजंदारी व कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना कारखान्याच्या सेवेत सामावून घेऊन त्यांना वेतनश्रेणी लागू करावी, अशीही प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

या मागण्यांसंदर्भातील मसुदा पत्र २४ ऑगस्ट २०२६ रोजी मुख्यमंत्री, सहकार मंत्री, कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघाचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक तसेच राज्याचे कामगार आयुक्त यांना देण्यात आल्याचे संघटनांनी सांगितले.

शासनाने २२ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ अर्थात बीआयआर कायदा रद्द करण्याबाबत अध्यादेश काढला. या निर्णयाच्या विरोधात महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ आणि महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघ या दोन्ही मान्यताप्राप्त संघटनांनी लोकशाही मार्गाने मोर्चा काढून आपला विरोध नोंदविला आहे.

महाराष्ट्र शासनाने जुलै २०२६ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ हा कायदा अधिसूचनेद्वारे रद्द केला आहे. हा कायदा साखर उद्योगाशी संबंधित असल्याने तो पूर्ववत सुरू करून त्याची अंमलबजावणी कायम ठेवावी. महाराष्ट्रातील साखर कामगारांचे प्रलंबित असलेले थकीत वेतन तातडीने अदा करण्यात यावे. बंद व आजारी साखर कारखाने सुरू करून तेथील कामगारांचे पुनर्वसन करण्यात यावे. रोजंदारी व कंत्राटी कामगारांना सेवेत सामावून घ्यावे : साखर उद्योगात रोजंदारी व कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना कारखान्याच्या सेवेत सामावून घेऊन त्यांना नियमानुसार वेतनश्रेणी लागू करावी.साखर कारखान्यांना उर्जितावस्था प्राप्त होण्यासाठी साखरेच्या किमान विक्री दरात (एम.एस.पी.) वाढ करण्यात यावी. आजारी, बंद आणि वेळेवर पगार न देणाऱ्या साखर कारखान्यांतील जे कामगार शेतकरी आहेत, त्यांचा महाराष्ट्र शासनाच्या सरसकट कर्जमाफी योजनेत समावेश करण्यात यावा.

वरील मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास महाराष्ट्रातील साखर व जोडधंद्यातील कामगार-कर्मचारी २२ ऑक्टोबर रोजी पहिल्या पाळीपासून बेमुदत काम बंद करून संपावर जाणार आहेत. या संपामध्ये राज्यातील साखर व जोडधंद्यातील सर्व कामगार-कर्मचारी सहभागी होणार असल्याचे दोन्ही संघटनांनी नोटीशीद्वारे स्पष्ट केले आहे.

## केडगावच्या व्यापाऱ्याला दिलासा

नगर – सिन्नर एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत अनाधिकृतपणे १०,००० लिटर ऑइल घेऊन जात असताना मानवी जीवितास धोका निर्माण केल्याच्या आरोपाखाली दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला टँकर आणि त्यातील १० हजार लिटर ऑइल मूळ मालकास परत करण्याचा आदेश सिन्नर न्यायालयाने दिला आहे.

यामध्ये केडगाव येथील व्यापाऱ्याच्या वतीने ॲड. सचिन श्रीनिवास पाठक (गुरुजी) यांनी युक्तिवाद केला. सिन्नर एमआयडीसी पोलिसांनी एका टँकर चालकाला ताब्यात घेऊन त्याच्याविरोधात जीवनावश्यक वस्तू कायदा, पेट्रोलियम कायदा आणि स्फोटक पदार्थ कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता.

टँकर मध्ये १०,००० लिटर बायोडिझेल असून ते अनाधिकृत पद्धतीने आणि मानवी जीवितास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने वाहतूक केली जात असल्याचा आरोप पोलिसांनी केला होता. या कारवाईत पोलिसांनी टँकरसह संपूर्ण ऑइल जप्त केले होते.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवतेचे मंदिर

## उद्योजक फुलचंद बाठिया यांचे प्रतिपादन; मोफत दंतरोग तपासणी, जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया शिबिर



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत दंतरोग तपासणी, जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी फुलचंद बाठिया, दिलीप रुणवाल, सौ.चंचलाबाई बाठिया आदींच्या हस्ते दीपप्रज्वलनाने शिबीराचा शुभारंभ करण्यात आला.

नगर – गुरुदेव आचार्य आनंदऋषीजी यांच्या आशीर्वादाने आनंदऋषीजी हॉस्पिटलची उभारणी करण्यात आली आहे. जैनसोशल फेडरेशनचे सर्व सदस्य अत्यंत तळमळीने व मानवसेवेच्या दृष्टिकोनातून आरोग्य सेवेचे कार्य करीत आहे. श्रीमती मदनदेवी लुंकड या मातोश्री असून ३६ वर्षांपूर्वी पतीच्या निधनानंतर त्यांनी प्रमुख आधारस्तंभ बनून सर्व परिवाराला मार्गदर्शन केले आहे. तसेच या मातोश्रींचे आशीर्वाद व संस्कार परिवाराला लाभले असल्याने त्यांचा जन्मदिवस आरोग्य शिबिराचे माध्यमातून साजरा होत आहे. याचा मनस्वी आनंद होत आहे. त्यांच्या अपार कष्टातून सर्व परीवाराचे जीवन समृद्ध झाले आहे. मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. असे समजून आरोग्य शिबिराच्या माध्यमातून होणारी रुग्णसेवा कौतुकास्पद आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवतेचे मंदिर असून आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात नेहमीच सहकार्य राहील, असे प्रतिपादन पुणे येथील उद्योजक फुलचंद बाठिया यांनी केले आहे.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल मध्ये मोफत दंतरोग तपासणी, जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी फुलचंद बाठिया, दिलीप रुणवाल, सौ.चंचलाबाई बाठिया, सौ.जयश्रीबाई रुणवाल, संजय लुंकड, गिरीश लुंकड, कचरदास लुंकड, दिलीप लुंकड, रमेश लुंकड, अनिल लुंकड, अभय लुंकड, अतुल लुंकड, अजित लुंकड, दिव्यांश लुंकड, अनिल दुगड आदींसह जैन सोशल फेडरेशन चे डॉ. वसंत कटारिया, डॉ.प्रकाश कांकरिया, संतोष बोथरा, अभय गुगळे, सतीश लोढा, डॉ.आशिष भंडारी, सुभाष भंडारी, वसंत चोपडा, शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ.पारितोष वारे, डॉ.अर्पणा पवार, डॉ.प्राची गांधी, डॉ.तृप्ती डुंगरवाल, मॅक्सी लोफेशियल सर्जन डॉ.मृदुला मुळे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, श्रीमती मदनदेवी लुंकड यांचा ९४ वा जन्मदिवस आरोग्य शिबीराने साजरा होत आहे. आदर्श वाढदिवस कसा साजरा करावा याचे हे उत्तम उदाहरण आहे. मातोश्री मदनदेवी लुंकड या अत्यंत धार्मिक असून नित्य देवाचे नामस्मरण करीत आहेत.त्यांच्या संस्कारातून लुंकड परिवार हा सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. त्यांची शंभरावी साजरी करण्याचे भाग्य आम्हाला मिळो. त्यांच्या आशीर्वाद व प्रेरणेने जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्यांना सामाजिक कार्य करण्याची ऊर्जा मिळत आहे. तसेच त्यांचे जावई पुणे येथील उद्योजक फुलचंद बाठिया यांनी सतरा अठरा वर्षापासून आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर पुणे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सहकार्य केले आहे. तसेच त्यांना सेवा कार्याची आवड असल्याने पूर्वीपासूनच आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या उभारणीत त्यांचा मोलाचा सहभाग आहे. लुंकड परीवारा सारखे दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने आनंदऋषीजी हॉस्पिटलचे सेवा कार्य प्रगतीपथावर आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात उद्योजक फुलचंद बाठिया यांचे मोठे योगदान लाभले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये डेंटल विभाग परिपूर्ण झालेला आहे. महिन्यातून दोन वेळा आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये शिबिरे घेण्यात येत आहे. या शिबिराच्या माध्यमातून अनेक रुग्णांना दिलासा मिळत आहे.

डॉ.अर्पणा पवार म्हणाले, सोमवार ते शनिवार आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये दंतरोग विभागाची ओपीडी सुरू आहे. या विभागामार्फत आत्याधुनिक पद्धतीने मशीनरी च्या साह्याने चांगल्या पद्धतीने उपचार केले जातात. स्माईल ट्रेन प्रकल्प अंतर्गत जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील. तसेच अत्यल्प दरात दात काढणे, मेटल कॅप, सिरॅमिक कॅप, रूट कॅनल, दातांची कवळी बसवणे, दातांमध्ये सिमेंट भरणे, इम्प्लांट आदी सुविधा येथे उपलब्ध आहेत.

या शिबिरात १२० रुग्णांची मोफत दंतरोग तपासणी करण्यात आल्या. या शिबिरासाठी जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विविध भागातून रुग्ण आले होते. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. सतिश लोढा यांनी आभार मानले.

## नमुना-१

### खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटिस

**भुसंपादन अधिकारी,तथा उपविभागीय अधिकारी, संगमनेर भाग संगमनेर यांचे कार्यालय,**
**दिनांक : ०१-१०-२०२६**

ज्याअर्थी, मौजे. संगमनेर बु, ता. संगमनेर येथील संगमनेर शहर भुयारी गटार योजना प्रकल्पातील सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प (S.T.P) साठी शासन निर्णय, महसुल व वन विभाग क्र.संकीर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेबंर, २०१५ व परिपत्रक दिनांक २५ जानेवारी २०१७ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांच्या नावे घेण्याबाबत प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचेकडे सादर केला होता.

आणि ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचेकडील आदेश क्रमांक भूसं/कार्या/१६-अ/ई-२०८७००६/२०२५ दिनांक ३०-०६-२०२५ व सुधारीत आदेश क्रमांक भूसं/कार्या/१६-अ/ई-२०८७००६/२०२६ दिनांक ११-०२-२०२६ व मा. जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र. ई ऑफीस- २०८७००६/२०२६ दिनांक ०७-०९-२०२६ अन्वये उक्त प्रस्ताव संबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन- ०१/२०१७/प्रक्र.) १२/अ-२, दिनांक २५ जानेवारी, २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्याअर्थी, आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार,मी अरुण उंडे, भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संगमनेर भाग संगमनेर याद्वारे,

(एक) अनुसुची -एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

आणि (दोन) प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी घेतांना जिल्हास्तरीय समितीमार्फत भुसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शोडयुल-१ च्या तरतुदीनुसार संबंधीत जमिनीसाठी परीगणीत होणा-या एकुण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देवुन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तिन) संबंधित भुधारकांकडुन शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपुर्णत: व अंतिमरित्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबधीत भुधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा विकल्प विहित नमुना भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, संगमनेर भाग संगमनेर/ मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत/ मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांचे कार्यालयातील प्राधिकृत अधिका-यामार्फत भुधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संगमनेर यांचे कार्यालयामध्ये / मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांच्या कार्यालयात प्राधिकृत अधिका-यांच्या कार्यालयीन वेळेत भुधारकांना किवा हितसंबंधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

अनुसुची-एक
खरेदी दयावयाच्या जमिनीचा तपशिल
जिल्हा - अहिल्यानगर

| भुसंपादन संस्थेचे नाव | गावाचेनाव | तालुका | एस आर नंबर | भुसंपादन क्रमांक / गट नंबर | सरळ खरेदी करावयाचे क्षेत्र हे. आर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर | संगमनेर बु. | संगमनेर | ०३/२०२५ | १९२/११ व १५ पैकी | ०.२० |
| | | | | १९३ पैकी | ०.१५ |

दिनांक :- ०१-१०-२०२६
ठिकाण:- संगमनेर

जिमाका /नगर/जाहि/१३९/२०२६

**(दयानंद गोरे)**
मुख्याधिकारी,
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

**(अरुण उंडे)**
भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, संगमनेर भाग संगमनेर

# महाराष्ट्रासाठी ५० हजार कोटींचे विशेष दुष्काळ पॅकेज द्या

## शेतकऱ्यांचे २.५० लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज माफ करा; पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना किरण काळेंचे निवेदन



नगर – महाराष्ट्रासाठी किमान रु. ५० हजार कोटींचे विशेष दुष्काळ निवारण व शेतकरी पुनर्वसन पॅकेज, शेतकऱ्यांचे प्रत्येकी रु. २.५० लाखांपर्यंतचे पीककर्ज माफ करणे, शेतकऱ्यांना हेक्टरी रु. १ लाख आणि शेतमजुरांना रु. २५ हजारांची आर्थिक मदत, विद्यार्थ्यांची शुल्कमाफी अशा महत्त्वपूर्ण मागण्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे महानगर प्रमुख किरण काळे यांनी लेखी निवेदनाद्वारे केल्या आहेत.

दोन दिवसांपूर्वीच इंडिया आघाडीच्या वतीने अहिल्यानगर मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी शिवसेनेचे नेते अंबादास दानवे, खा. निलेश लंके, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख आ. सुनील शिंदे यांनी सरकारवर तोफ डागली होती. त्यानंतर आता महानगर प्रमुख किरण काळे यांनी केंद्र व राज्य सरकारकडे दिलासा देणाऱ्या मागण्या केल्या आहेत. केवळ बैठका, घोषणा आणि पारंपरिक निकषांनुसार मदत देण्यापुरते शासनाचे प्रयत्न मर्यादित न राहता प्रत्यक्ष लाभ शेतकरी व संकटग्रस्त कुटुंबांपर्यंत कालमर्यादेत पोहोचला पाहिजे, अशी भूमिका काळे यांनी मांडली आहे.

काळे यांनी निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील ३०० हून अधिक तालुक्यांत दुष्काळ आहे. शेतीचा खर्च व महागाई लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांचे रु. २.५० लाखांपर्यंतचे पीककर्ज तसेच ट्रॅक्टर व कृषी अवजारांची कर्ज माफ करावीत. आणेवारी, पीकस्थिती व पंचनाम्यांतील त्रुटींमुळे कोणताही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये. ५० पैसे किंवा अधिक आणेवारी असलेल्या गावांचाही फेरआढावा घेऊन पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि रोजगार हमीच्या कामांचे नियोजन करावे.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्कमाफी : दुष्काळग्रस्त व आर्थिक संकटातील कुटुंबांमधील शहरी आणि ग्रामीण विद्यार्थ्यांचे शाळा, महाविद्यालये व पात्र व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क माफ करावे. शैक्षणिक संस्थांचा आर्थिक भार शासनाने उचलावा, अशी मागणी काळेंनी केली आहे.

सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करा : सरकारने प्रत्येक जिल्ह्यात सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करावेत. वधूंना एक तोळ्याचे मंगळसूत्र, साडी-चोळी व संसारोपयोगी भांडी द्यावीत. सामूहिक भोजनाचा खर्च शासनाने करावा, जेणेकरून गरजू कुटुंबांचा विवाहखर्च कमी होईल. या उपक्रमाचे पालकत्व जिल्हास्तरावर पालकमंत्री यांच्यावर तर कार्यवाहक म्हणून जिल्हाधिकाऱ्यांवर जबाबदारी शासनाने सोपवावी असे किरण काळे यांनी म्हटले आहे. नवरात्र, दसरा, दिवाळी आणि ख्रिसमसपूर्वी संकटग्रस्त शेतकरी व शेतमजुरांना मदत द्यावी. यामुळे ग्रामीण कुटुंबांची खरेदीक्षमता टिकून स्थानिक व्यापारी व लघु व्यावसायिकांनाही आधार मिळेल, असं त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

**सरकारी खर्चात कपात करा :** किरण काळेंनी म्हटले आहे, अनावश्यक सरकारी समारंभ, जाहिराती व खर्चिक कार्यक्रमांवरील खर्च कमी करून उपलब्ध निधी दुष्काळ निवारण, शेतकरी मदत, शिक्षण व पाणीपुरवठ्यासाठी वापरावा. केंद्र व राज्य सरकारने प्रत्येक योजनेसाठी निधी, कालमर्यादा आणि जबाबदार अधिकारी निश्चित करावेत. पात्र लाभार्थ्यांना थेट आर्थिक मदत देऊन जिल्हानिहाय प्रगती अहवाल सार्वजनिक करावेत.

**हेल्पलाइन सुरू करा :** केवायसी, कागदपत्रे आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवताना दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी विशेष हेल्पलाइन व सहाय्य केंद्रे सुरू करावीत. वाडी-वस्त्यांपर्यंत मदत पोहोचवून पाणी व चाऱ्याच्या प्रश्नांवर तातडीने उपाय करावेत. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी आणि सर्वसामान्य कुटुंबांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी, आर्थिक मदत, पाणी-चारा नियोजन व सामाजिक सहाय्याच्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात. या मागण्यांवर केंद्र व राज्य सरकारने कालमर्यादेत निर्णय घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, अशी मागणी किरण काळे यांनी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, राज्यसभा सभापती, लोकसभेतील विरोधी पक्षनेते, महाराष्ट्राचे राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष, विधान परिषद सभापती, भारत सरकारचे कॅबिनेट सचिव आणि महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **जुबेदा हमीद शेख, रा. मुकुंदनगर, अ.नगर** यांचे खरेदी मालकीची असुन सदर मिळकतीचा व्यवहार आमचे अशिला बरोबर झालेला असुन लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे चालु वाद, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, जप्ती, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **(सात)** दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी. दि. ०९/१०/२०२६.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी व तालुका नगर पैकी, अहिल्यानगर (अहमदनगर), महानगरपालिका हद्दीतील, मौजे भिंगार येथील गजानन सह.गृह संस्था मर्या. अहमदनगर मधील रो-होसिंग मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे -

| स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ३४५/२ब | ६३ | ४३.६८ चौ.मी. |

हा संपुर्ण प्लॉट व सदर प्लॉटमध्ये मंजुर प्लॅनप्रमाणे लोडबेअरींगमध्ये बांधकाम झालेल्या रो-हौसिंग स्कीम मधील रो-हौसिंग ब्लॉक नं. ६३/५ असुन याचे क्षेत्र १८.५८ चौ.मी असुन यात एक रुम, एक किचन रुम, संडास बाथरुम असे असुन बाकी मागे पुढे खुली जागा असुन अशी बांधकामासह मिळकती बाबत.

यांसी चतु:सिमा-
पुर्वेस - बोळ, दक्षिणेस - ब्लॉक नं. ६३/६
पश्चिमेस - रस्ता, उत्तरेस - ब्लॉक नं. ६३/४
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

**ॲड. तनवीर एम.शेख** नोटरी पब्लिक (भारत सरकार)
**ॲड. फरहान आसिफ शेख**
कस्तुरी प्लाझा शेजारी, डावरे गल्ली, अहमदनगर
मो.नं.९२७०४६४६००/ ९८६६१४५९३२

# अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेची पंचवार्षिक निवडणूक पूर्ण ताकतीने लढवणार

## खासदार निलेश लंके व माजी खासदार सदाशिव लोखंडे यांचा निर्धार



नगर – अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढणार असून सर्वसामान्य शेतकरी सभासदांची तशी भावना असल्याचे खासदार निलेश लंके व माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी सांगितले.

बँकेच्या निवडणुकी संदर्भात समविचारी उमेदवारांना सोबत घेऊन लढण्यासंदर्भात नुकतीच बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा सहकारी बँक ही खऱ्या अर्थाने सर्वसामान्य शेतकऱ्यांची बँक आहे. या बँकेच्या सेवेचा लाभ लाभ हा त्यांनाच झाला पाहिजे. आज मात्र ही बँक शेतकऱ्याची बँक राहिलेली नसून ठराविक कारखानदारांची व भांडवलदारांची झालेली आहे. म्हणून बँकेची निवडणूक सर्व ताकतीनिशी लढवण्याचे ठरवण्यात आले आहे.

या बैठकीसाठी खासदार निलेश लंके, माजी खासदार सदाशिव लोखंडे, माजी आमदार राहुल जगताप, केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन प्रताप ढाकणे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रताप शेळके, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा. सीताराम काकडे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अरुण पाटील कडू, जिल्हा परिषदच्या माजी सभापती हर्षदा काकडे, शिवशंकर राजळे, बाळासाहेब हराळ, माजी संचालक अमित भांगरे, बाळासाहेब साळुंखे, बाळासाहेब विखे, सुधीर मस्के, एकनाथ घोगरे, अमृत धुमाळ, किरण कडू, शिवसेना नेते रावसाहेब खेवरे, किसनराव लोटके, रामेश्वर निमसे, अंकुश उगले, साहिल खर्डे, आदींसह इच्छुक उमेदवार व मतदार उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली मिळकत या विद्यमान मालक **सुखदेव दिनकर सुर्यवंशी रा. मु. पो. चांदे खुर्द, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विद्यमान मालक यांनी विसारापोटी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात **(७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं. २३/३/१ मधील प्लॉट नं. ३ हिस्सा नंबर १० यांचे एकूण क्षेत्रफळ १२२.२९ चौ. मी. हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील असलेले तळ मजल्याचे बांधकाम क्षेत्र ६१.४० चौ.मी.+ पहिल्या मजल्याचे बांधकाम क्षेत्र ४८.१० चौ.मी. असे एकूण बांधकाम क्षेत्र १०९.५० चौ.मी. ही संपूर्ण मिळकत.**

**यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे.**
पुर्वेस :- सर्व्हे नंबर २२/१अ/२अ, दक्षिणेस - प्लॉट नं. ४,
पश्चिमेस :- ६.00 मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस :- प्लॉट नं. २,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
अहिल्यानगर, दिनांक :- ०९/१०/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टमध्ये नमुद केलेल्या ऑफिस, स्टोअर व दुकान गाळा (युनिट) मिळकतीचे विद्यमान मालक **पंडीत ॲक्सीडेंट हॉस्पीटल,** स्टेशन रोड, अहमदनगर हि भागीदारी फर्म आहे. सदर मिळकत त्यांनी त्यांचे स्वकष्टार्जित उत्पन्नातून तत्कालीन मालकांकडून खरेदी केलेली आहे व खरेदीच्या तारखेपासून ते सदर मिळकतीचा मालकी हक्क, ताबे, शांततामय कब्जे, वहिवाट करत उपभोग घेत आहे तसेच त्यांना तिची विक्री करणे विल्हेवाट लावणे कायमस्वरूपी साठी तब्दील करणे इत्यादीचा पूर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याचा त्याचप्रमाणे सदर मिळकत संपूर्णपणे कोणत्याही बोजा विरहित निर्वेध निर्जोखीम अशी आहे असा खात्री व भरवसा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तसेच विद्यमान मालकांनी सदर मिळकत आमचे अशिलांस कायामखुश खरेदी देण्याचा व्यवहार नक्की करून आमच्या अशिलांकडून विसारापोटी रक्कम हि स्वीकारलेली आहे. यदाकदाचित सदर मिळकत आमच्या अशिलास हस्तांतर बाबत कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत असल्यास अथवा सदर मिळकत मध्ये कुणाचेही गहाण, दान, पोटगी, साठेखत, अव्वल जप्ती, मनाई हुकुम, बोजा, कर्ज तारण, कब्जा अथवा इतर कोणत्याही कारणाने हक्क अधिकार, हितसंबंध अथवा अधिकार निर्माण झालेले असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी समक्ष भेटून खात्री पटवून द्यावी अन्यथा आमचे अशिल मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कुणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. मुद्दामहून कुणाचीही फसवणूक होवु नये म्हणून सदर जाहीर नोटीस प्रसिद्धीस दिली आहे

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :** डि।। अहिल्यानगर (अहमदनगर) सब डी।। तालुका नगर पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील शहर नगर मधील सिटी सर्व्हे नं. ३४२०/१ याचे क्षेत्र ३४८.७ चौ.मी. यावर बांधण्यात आलेल्या **"धनराज पॅलेस अपार्टमेंट'** या अपार्टमेंट मधील खालील वर्णन असलेली ऑफिस, स्टोअर व दुकान गाळा मिळकती.

| अनु. क्र. | मजला | मिळकत प्रकार व वर्णन | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | १ला (पहिला) | ऑफिस (युनिट) नं. १०१ | १९.६१ | पूर्वेस :- ओपन टू स्काय, दक्षिणेस:- ओपन टू स्काय, पश्चिमेस:- ऑफिस नं. १०२, उत्तरेस : -ओपन पॅसेज |
| २ | १ला (पहिला) | ऑफिस (युनिट) नं. १०२ | २६.८२ | पूर्वस :- ऑफिसनं. १०१, दक्षिणेस :- ओपन टू स्काय, पश्चिमेस :- जीना, उत्तरेस : - ओपन पॅसेज |
| ३ | १ला (पहिला) | ऑफिस (युनिट) नं. ११४ | २१.५४ | पूर्वस :- ओपन टू स्काय, नवीपेठ रोड दक्षिणेस :- एक्झिट, पश्चिमेस :- ऑफिस नं. ११३, उत्तरेस : - सि.स.नं. ३४१९ |
| ४ | तळ (गाऊंड) | दुकान गाळा (युनिट) नं. जी-१ | १९.६१ | पूर्वस :- मार्जीन स्पेस, दक्षिणेस :- सि.स.नं. ३४२१, पश्चिमेस :- दुकान नं.जी-२, उत्तरेस :- वाग |
| ५ | तळ (गाऊंड) | दुकान गाळा (युनिट) नं. जी-२ | २६.८६ | पूर्वस :- दुकान गाळा नं. जी-१, दक्षिणेस :- सि.स.नं. ३४२१, पश्चिमेस :- दुकान नं.जी-३, उत्तरेस :- वाग |
| ६ | बेसमेंट | स्टोअर नं. १ | ४६.४४ | पूर्वस :- नवीपेठ, दक्षिणेस :- सि.स.नं. ३४२१, पश्चिमेस :- स्टोअरनं २, उत्तरेस :- कॉमन पॅसेज |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकती (यदाकदाचीत सदर चतुः सिमा चुकीच्या आसल्यास रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे चतु:सिमा ग्राह्य समजाव्यात) यातील मिळणाऱ्या सुविधा, स्वतंत्र लाईट मिटर,लाईट फिटींग, फर्निचर, फिक्चर, पिण्याचे पाणी कनेक्शन सह, कॉमन पार्किंग सर्व समाईक सुख सुविधा, तदंगभुत वस्तु, जाणे येण्याच्या हक्कांसह, वागवहिवाटीसह, काही एक राखुन न ठेविता

दिनांक ०९/१०/२०२६
अहिल्यानगर(अहमदनगर)

**ॲड. एस एल आसावा**
द्वारा चेंबर नंबर १०९, लॉयर्स चेंबर्स, जुने जिल्हा न्यायालय आवार, अहिल्यानगर (अहमदनगर),
जिल्हा : अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड ४१४००१

# महानगरपालिका व नगरपालिकांचे 'स्वतंत्र ॲप' तयार करण्यात यावेत

## राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सचिव अतुल काळोखे यांची मागणी

नगर – महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना त्यांच्या दैनंदिन नागरी समस्यांसाठी वारंवार कार्यालयात जावे लागते. नागरिकांच्या तक्रारींचे जलद आणि पारदर्शक पद्धतीने निराकरण व्हावे, यासाठी प्रत्येक महानगरपालिका व नगरपालिकेचे स्वतंत्र मोबाईल ॲप तयार करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव अतुल काळोखे यांनी केली.

या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना रस्ते, पाणीपुरवठा, कचरा, स्ट्रीट लाईट, स्वच्छता तसेच इतर नागरी समस्यांबाबत तक्रार नोंदवता यावी. तक्रारीसोबत फोटो व संबंधित ठिकाणाची माहिती देण्याची सुविधा असावी. तक्रार कोणत्या विभागाकडे पाठवण्यात आली, त्यावर काय कार्रवाई झाली आणि तक्रारीचे निराकरण कधी झाले, याची माहिती नागरिकांना पवर मिळावी.

अशा स्वतंत्र पमुळे नागरिकांचा वेळ वाचेल, प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता वाढेल आणि नागरिकांच्या समस्यांचे वेळेत निराकरण होण्यास मदत होईल. त्यामुळे राज्यातील सर्व महापालिका व नगरपालिकांसाठी अशा प्रकारची स्वतंत्र ॲप व्यवस्था तयार करण्यात यावी.

यावेळी बोलताना अतुल काळोखे म्हणाले की, नागरिकांना छोट्या-छोट्या समस्यांसाठी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या मारव्या लागु नयेत. तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून नागरिकांच्या तक्रारी प्रशासनापर्यंत थेट पोहोचल्या पाहिजेत आणि त्यांचे वेळेत निराकरण झाले पाहिजे.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग, लोणी**
**अहिल्यानगर (मुख्यालय लोणी)**

पत्ता -सिंचन भवन,फकीरवाडा, अहिल्यानगर दुरध्वनी क्रमांक- ०२४१- २३२४०१८
ई-मेल पत्ता- eeaidn@gmail.com

### फेर ई-निविदा सूचना क्र. ०८ सन २०२६-२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर, पाटबंधारे विभाग (मुख्यालय लोणी) जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडुन (गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडुन मान्यताप्राप्त सूचीबध्द (Empanelment) केलेले केवळ १३ निविदाकार) खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, अहिल्यानगर पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर(मुख्यालय लोणी) यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारलेली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत (जीएसटी वगळून) |
|---|---|---|
| १ | को. प. बंधारा मांडवे ता. श्रीरामपूर डाव्या बाजुच्या पोहोच रस्त्याचे मजबुतीकरण करणे. | रु. १६.२९ लक्ष |
| २ | को. प. बंधारा वांगी ता. श्रीरामपूर येथील दुरुस्ती करणे. | रु. ३३.६० लक्ष |

जिल्हा - अहिल्यानगर
ई-निविदा उपलब्ध कालावधी दि.०९/१०/२०२६ ते दि. १६/१०/२०२६ अखेर
ई-निविदा उघडणे दि.१९/१०/२०२६ (शक्य झाल्यास)

जा. क्र. अपावि/लेशा-२/६१२९/सन २०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
अहिल्यानगर पाटबंधारे विभाग, अहिल्यानगर जिमाका/नगर/जाहि/१४४/२०२६

**कार्यकारी अभियंता**
अहिल्यानगर पाटबंधारे विभाग
अहिल्यानगर
(मुख्यालय लोणी)

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता



## दीर्घायुष्यासाठी लहान बदलही पुरेसा

दीर्घायुष्य मिळवण्यासाठी जिममध्ये तासन्तास घाम गाळण्याची किंवा आहारात मोठे बदल करण्याची गरज नाही. केवळ व्यायामात दोन मिनिटांची वाढ आणि झोपेत पाच मिनिटांची भर घातल्यास आरोग्यावर कमालीचे सकारात्मक परिणाम होऊ शकतात आणि तुमचे आयुष्य वाढू शकते, असे ब्रिटनमधील एका मोठ्या संशोधनातून समोर आले आहे. 'क्लिनिकल मेडीसीन' नियतकालिकात १३ जानेवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या या संशोधनासाठी 'यूके बायोबँक'मधील सुमारे ६०,००० लोकांच्या आरोग्यविषयक माहितीचा अभ्यास करण्यात आला. संशोधकांनी जीवनातील अशा लहानात लहान बदलांचा शोध घेतला, ज्यामुळे मानवी आयुर्मान मोजता येण्याजोग्या प्रमाणात वाढू शकते. या अभ्यासातील सांख्यिकीय प्रारूपांनुसार, पुढील तीन लहान बदलांमुळे आयुर्मानात एक वर्षाची वाढ होऊ शकते:

**व्यायाम :** दिवसातून फक्त २ मिनिटे अतिरिक्त मध्यम ते तीव्र स्वरूपाचा शारीरिक व्यायाम करणे.

**झोप :** दररोज केवळ ५ मिनिटे अतिरिक्त झोप घेणे.

**आहार :** दररोजच्या जेवणात अर्धा भाग भाज्यांचे प्रमाण वाढवणे. संशोधनानुसार, ज्या लोकांच्या सवयी सर्वात वाईट (तळाच्या ५ टक्क्यांत) होत्या, त्यांच्या तुलनेत वरील बदल करणाऱ्या लोकांचे आयुर्मान लक्षणीयरीत्या जास्त असल्याचे आढळले. सिडनी विद्यापीठातील आहारतज्ज्ञ आणि प्रमुख संशोधक निकोलस कोमेल यांच्या मते, जीवनातील विविध पैलूंमध्ये केलेले छोटे सुधार हे त्यांच्या स्वतंत्र परिणामांपेक्षा एकत्रितपणे अधिक प्रभावी ठरतात.

**उदाहरणार्थ :** केवळ झोपेतून एक वर्षाचे अतिरिक्त आयुष्य मिळवायचे असेल, तर व्यक्तीला दररोज २५ मिनिटे जास्त झोपावे लागेल, जे अनेकांसाठी शक्य नसते. परंतु, जेव्हा आपण झोप, आहार आणि व्यायाम या तिन्हींमध्ये अगदी किरकोळ सुधारणा करतो, तेव्हा त्यांचा एकत्रित परिणाम मोठा असतो. केंब्रिज विद्यापीठातील सांख्यिकीशास्त्रज्ञ स्टीफन बर्जेस यांनी स्पष्ट केले की, हे संशोधन थेट 'हमी' देत नाही. 'हा अभ्यास या सवयी आरोग्यात सुधारणा करतात हे सिद्ध करण्यापेक्षा, जर आपण या सवयी बदलल्या, तर आपल्या आयुर्मानावर काय परिणाम होऊ शकतो, याचे एक प्रारूप मांडतो,' असे त्यांनी नमूद केले.




## 'एआय थ्रोट'ची किमया

एखाद्या व्यक्तीने एकही शब्द न बोलता आपल्या भावना आणि विचार स्पष्टपणे मांडले, तर? हे एखाद्या चित्रपटातील दृश्यासारखे वाटत असले, तरी विज्ञानाच्या जगात आता हे वास्तव बनले आहे. केंब्रिज विद्यापीठ आणि बेइहांग विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी एकत्रितपणे एक असा 'एआय इंटेलिजेंट थ्रोट' (कृत्रिम बुद्धिमत्तायुक्त गळा) विकसित केला आहे, जो अर्धांगवायू मुळे बोलण्याची शक्ती गमावलेल्या लाखो रुग्णांसाठी आशेचा किरण ठरणार आहे.

या उपकरणाला Revoice असे नाव देण्यात आले आहे. हा गळ्यात घालण्याजोगा एक छोटासा 'नेकबँड' असून तो रुग्णाच्या ओठांच्या हालचाली आणि गळ्यातील सूक्ष्म कंपने ओळखून त्यांचे शब्दांत रूपांतर करतो. हा विशेषतः ' Dysarthria' (डायसार्थ्रिया) असलेल्या रुग्णांसाठी बनवला आहे. या आजारात रुग्णाच्या मेंदूला काय बोलायचे आहे हे माहित असते, परंतु स्नायूंच्या कमकुवतपणामुळे त्यांना शब्द उच्चारता येत नाहीत. साधारणपणे, अशा गंभीर समस्यांवर उपचार करण्यासाठी मेंदूमध्ये चिप किंवा इम्प्लांट बसवावे लागते, ज्यासाठी शस्त्रक्रिया आवश्यक असते. मात्र, ' Revoice' हे पूर्णपणे 'नॉन-इनवेसिव्ह' आहे. म्हणजे हा एक मऊ बँड असून तो गळ्याच्या बाहेरील भागावर एखाद्या दागिन्याप्रमाणे (चोकर) सहज परिधान करता येतो. यात कोणतीही चिरफाड करण्याची गरज नाही.

या बँडमधील सेन्सर त्वचेतील ०.१ टक्के इतका किरकोळ बदलही अचूकपणे टिपतात. रुग्ण जेव्हा आवाज न काढता केवळ ओठ किंवा गळा हलवून काही बोलण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा हे उपकरण गळ्यातील कंपने आणि 'कॅरोटिड आर्टरी'ची पल्स रेकॉर्ड करते. हे रेकॉर्ड केलेले डेटा दोन एआय सिस्टिम्सकडे पाठवले जाते. पहिला भाग तुटक शब्दांना जोडून वाक्य तयार करतो, तर दुसरा भाग रुग्णाच्या भावना ओळखून त्याला नैसर्गिक आवाज देतो. ही सर्व प्रक्रिया दर १०० मिलीसेकंदात पूर्ण होते, ज्यामुळे समोरच्या व्यक्तीशी संवाद साधताना तो अत्यंत नैसर्गिक वाटतो. पाच स्ट्रोक रुग्णांवर या उपकरणाची चाचणी घेण्यात आली. या चाचणीत शब्द ओळखण्यात ९५.८ टक्के आणि पूर्ण वाक्य ओळखण्यात ९७.१ टक्के इतकी जबरदस्त अचूकता दिसून आली आहे. या उपकरणाची बॅटरी दिवसभर चालते आणि ते वापरण्यास अत्यंत आरामदायी आहे. भविष्यात हे तंत्रज्ञान पार्किन्सन आणि मोटर न्यूरॉन आजार असलेल्या रुग्णांसाठीही जीवनदायी ठरेल, असा विश्वास संशोधकांनी व्यक्त केला आहे.

## सातमजली उंच लाटांचा थरार



नुकत्याच समोर आलेल्या एका उपग्रह छायाचित्राने पोर्तुगालच्या किनारपट्टीवरील निसर्गाचे रौद्ररूप जगासमोर आणले आहे. या चित्रात ७ मजली इमारतीइतक्या उंच लाटा समुद्रात उसळताना दिसत असून, या प्रचंड शक्तीमुळे समुद्राच्या तळातील वाळू आणि गाळाचे ढग अवकाशातून स्पष्टपणे दिसत आहेत. विशेष म्हणजे, ज्या दिवशी हे छायाचित्र टिपले गेले, त्याच दिवशी एका १८ वर्षीय स्थानिक सर्फरने या अजस्र लाटांवर स्वार होऊन नवा जागतिक विक्रम नोंदवला आहे.

'लँडसॅट ८' या उपग्रहाने पश्चिम पोर्तुगालमधील 'नाझरे' शहराजवळचे हे दृश्य टिपले आहे. नाझरे हे शहर जगातील सर्वात उंच लाटांसाठी ओळखले जाते. या भागात उसळलेल्या लाटांची उंची साधारणपणे ८० फूट (२४ मीटर) इतकी होती, जी एका ७ मजली इमारतीच्या उंचीएवढी आहे. या लाटा इतक्या शक्तिशाली होत्या की त्यांनी समुद्राच्या तळातील वाळू उपसून ती विरुद्ध दिशेला फेकली, ज्यामुळे समुद्राच्या पाण्यात १० किलोमीटरपर्यंत लांब गाळाचे लोट पसरले होते. नासाच्या 'अर्थ ऑब्झर्व्हेटरी'ने ही माहिती दिली आहे. याच रौद्र लाटांच्या दरम्यान, स्थानिक सर्फर अँटोनियो लॉरेनो याने सुमारे १०१.४ फूट (३०.९ मीटर) उंच लाटेवर सर्फिंग करण्याचा धाडसी पराक्रम केला. मानवी इतिहासात आजवर सर्फिंग केलेली ही सर्वात उंच लाट मानली जात आहे. हा विक्रम 'वर्ल्ड सर्फ लीग'द्वारे अधिकृतपणे प्रमाणित करण्यात आलेला नाही, कारण त्यांच्या प्रतिनिधींनी लाटेची उंची मोजली नव्हती. मात्र, लिस्बन विद्यापीठातील समुद्रशास्त्रज्ञांनी व्हिडीओचे विश्लेषण करून ही उंची १०१.४ फूट असल्याचे स्पष्ट केले आहे. सुमारे १५,००० लोकसंख्या असलेल्या नाझरे शहरात दरवर्षी 'बिग-वेव्ह' सर्फिंग स्पर्धांचे आयोजन केले जाते. येथील लाटा इतक्या वेगवान आणि उंच असतात की सर्फरना जेट स्कीच्या मदतीने लाटेच्या मध्यभागी सोडावे लागते. या काळात लाटांची उंची ५० फुटांपर्यंत असते; परंतु यंदाच्या ८० ते १०० फुटी लाटा अत्यंत धोकादायक श्रेणीतील होत्या.

## पिरॅमिड बांधणीचे तंत्र

इजिप्तमधील भव्य पिरॅमिड कसे बांधले गेले, हे रहस्य अनेक दशकांपासून संशोधकांना चकित करत असते. आता एका नव्या संशोधनातून एक अतिशय रंचक माहिती समोर आली आहे. संशोधकांच्या मते, पिरॅमिड बांधण्यासाठी पुली (घिरणी) आणि काऊंटरवेट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असावा.



या पद्धतीमुळे प्रचंड वजनाचे दगड वर ओढणे खूप सोपे झाले असावे, ज्यामुळे पिरॅमिड इतक्या कमी वेळात आणि इतक्या मोठ्या उंचीपर्यंत उभारता आले. डॉ. सायमन अँड्रियास श्यूरिंग आणि त्यांच्या पथकाने पिरॅमिडची रचना तसेच दगड घडवण्याच्या पद्धतींचा सखोल अभ्यास केला. इजिप्तचा ग्रेट पिरॅमिड हा जगातील सर्वात मोठ्या आश्चर्यांपैकी एक मानला जातो. या पिरॅमिडच्या बांधकामासाठी सुमारे २३ लाख चुनखडीचे दगड वापरले आहेत. यामधील सर्वात लहान दगडाचे वजन सुमारे २,००० किलो, तर सर्वात मोठ्या दगडाचे वजन जवळपास ६०,००० किलोपेक्षा अधिक होते.

हा पिरॅमिड बांधायला सुमारे २० वर्षे लागली असावीत. याचा अर्थ असा की, मजुरांनी जवळपास प्रत्येक मिनिटाला एक दगड योग्य जागी बसवला असावा. संशोधकांचे असेही मत आहे की, पिरॅमिडच्या आत उतार असलेले मार्ग तयार केले होते. या मार्गांवर मोठ्या वजनाच्या यंत्रणा म्हणजेच काऊंटरवेटस् बसवलेले होते. जेव्हा एक जड वजन खाली येत असे, तेव्हा पुलीच्या मदतीने ते दुसरा जड दगड वर ओढत असे. ही प्रणाली अगदी आजच्या लिफ्टसारखी काम करत होती. यामुळे मजुरांची ताकद वाचली आणि दगड अत्यंत अचूकतेने मोठ्या उंचीपर्यंत पोहोचवता आले.

## शंभरी पार करूनही...



आजच्या आधुनिक काळात हेल्दी लाईफस्टाईल म्हणजे लवकर उठणे, योगा करणे, वेळेवर झोपणे आणि जंक फूडपासून दूर राहणे असे मानले जाते; पण चीनमधील १०१ वर्षांच्या एका आजींनी या सर्व नियमांना जणू आव्हानच दिले आहे. या आजी ना लवकर झोपतात, ना सकाळी लवकर उठतात आणि ना कडक आहार पाळतात. तरीही त्या पूर्णपणे तंदुरुस्त आहेत, मानसिकदृष्ट्या सक्रिय आहेत आणि सगळ्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांचे सर्व दात अजूनही शाबूत आहेत.

जियांग यांच्या दीर्घायुष्याचे सर्वात मोठे कारण, कदाचित त्यांची विचारसरणी आणि स्वभाव आहे. कुटुंबीय सांगतात की, त्या अतिशय शांत स्वभावाच्या आहेत, पटकन रागावत नाहीत आणि कोणाशीही वैर धरून ठेवत नाहीत. नकारात्मक गोष्टींवर जास्त लक्ष देत नाहीत आणि प्रत्येक परिस्थितीत आनंदी राहण्याचा प्रयत्न करतात. सोशल मीडियावर त्यांच्या दिनचर्येचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर लोकांसह डॉक्टरही चकित झाले आहेत की, इतकी बेफिकीर जीवनशैली असूनही इतके दीर्घायुष्य कसे काय? चीनच्या झेजियांग प्रांतातील वेंझोउ शहरात राहणाऱ्या जियांग युएछिन यांची दिनचर्या इतर वृद्धांपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. जिथे बहुतेक वृद्ध रात्री ९-१० वाजेपर्यंत झोपतात, तिथे जियांग रात्री जवळपास २ वाजेपर्यंत टीव्ही पाहत बसतात. त्यानंतर त्या आरामात झोपतात आणि सकाळी साधारण १० वाजता उठतात.

कुटुंबीयांच्या मते, त्यांना झोपेची कोणतीही समस्या नाही आणि त्यांची झोप खोल व सलग असते. जियांग यांचा आहार कोणत्याही आहारतज्ज्ञाला चकित करू शकतो. त्या अनेकदा नाश्ता करतच नाहीत आणि आपले पहिले जेवण उशिरा सकाळी घेतात. संध्याकाळी त्या लवकर जेवण करतात आणि रात्री भूक लागली तर पुन्हा स्नॅक्स खातात. त्यांच्या आवडत्या पदार्थांमध्ये पारंपरिक वेंझोउ मिठाया, बिस्किटे, चिप्स, शकिमा आणि वाळलेले रताळे यांचा समावेश आहे. म्हणजेच त्यांच्या आहारात जंक फूडची कमतरता नाही, असे स्पष्टपणे म्हणता येईल.

मात्र, तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, त्या कधीही गरजेपेक्षा जास्त खात नाहीत आणि फक्त भूक लागली तेव्हाच खातात. अति खाणे टाळणे आणि शरीराचे संकेत समजून घेणे हे त्यांच्या चांगल्या आरोग्याचे एक मोठे कारण मानले जाते. जियांग यांचे १०१ वय असूनही त्यांना ना कृत्रिम दात बसवावे लागले आहेत, ना कोणताही मोठा दंतउपचार करावा लागला आहे. कुटुंबीयांच्या मते, त्या नेहमी हळूहळू आणि लक्षपूर्वक जेवतात. कधीही घाई करत नाहीत आणि प्रत्येक घास नीट चावून खातात. डॉक्टरांचे मत आहे की, या सवयींमुळेच त्यांचे दात मजबूत राहण्यास मदत झाली आहे. याशिवाय त्या रोज सकाळी एक कप ग्रीन टी नक्की पितात, जी अँटिऑक्सिडंटस्ने समृद्ध मानली जाते.

## सर्वात संथ धावणारी रेल्वे

भारतामध्ये दररोज सुमारे १३ हजार प्रवासी रेल्वे गाड्या धावतात आणि भारतीय रेल्वे ही जगातील चौथी सर्वात मोठी रेल्वे सेवा आहे. जिथे अनेक गाड्या १५० किलोमीटर प्रतितासपेक्षा अधिक वेगाने धावतात; पण भारतात अशी एक रेल्वे गाडी आहे जिचा वेग ऐकून लोक थक्क झाल्याशिवाय राहत नाहीत.

ही रेल्वे ५ तासांत केवळ ४६ किलोमीटरचे अंतर पार करते, म्हणजेच तिचा सरासरी ताशी वेग सुमारे ९ किलोमीटर इतका आहे. ही संथ धावणारी रेल्वे निलगिरी माऊंटन रेल्वे असून, ती तामिळनाडूमधील मेट्टुपालयम ते ऊटी दरम्यान धावते. ही रेल्वे केवळ ४६ कि.मी.चा प्रवास सुमारे ५ तासांत पूर्ण करते. मात्र डोंगर, बोगदे आणि हिरवळीच्या सान्निध्यातून होणारा हा प्रवास अतिशय सुंदर आणि अविस्मरणीय मानला जातो. ही रेल्वे तामिळनाडूच्या डोंगराळ भागातून धावते आणि ऊटी व कुन्नूरला जाणाऱ्या पर्यटकांची पहिली पसंती मानली जाते. विशेष म्हणजे ही रेल्वे इतकी लोकप्रिय आहे की तिची तिकिटे आधीच बुक करावी लागतात. या रेल्वे मार्गाचा प्रस्ताव १८५४ मध्ये मांडण्यात आला होता.



अवघड डोंगराळ मार्ग आणि उंचीमुळे याचे बांधकाम १८९१ मध्ये सुरू होऊन ९०८ मध्ये पूर्ण झाले. ही रेल्वे रॅक अँड पिनियन प्रणालीवर चालते, ज्यामुळे ती तीव चढही सहज पार करू शकते. या ऐतिहासिक आणि तांत्रिक वैशिष्ट्यांमुळेच या रेल्वेला युनेस्को वर्ल्ड हेरिटेज साईटचा दर्जा देण्यात आला आहे.

## महिलांमध्ये हृदयविकार घातक

महिलांमध्ये मृत्यूच्या मुख्य कारणांपैकी हृदयविकार हे एक प्रमुख कारण आहे. हृदयविकारामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या कर्करोगापेक्षाही जास्त आहे. स्त्रियांमध्ये हृदयविकाराची लक्षणे पुरुषांपेक्षा वेगळी असतात, ज्यामुळे अनेकदा या समस्येकडे दुर्लक्ष होते. स्त्रियांमधील हृदयविकाराची कारणे, लक्षणे आणि बचावाचे उपाय जाणून घेऊया. हृदयविकाराची अनेक कारणे असू शकतात, जसे की कोलेस्ट्रॉल, उच्च रक्तदाब, मधुमेह, धूम्रपान आणि आनुवंशिकता. मात्र, स्त्रियांमध्ये हृदयविकाराचे काही अतिरिक्त जोखीम घटक (Risk F$actors) असतात, ज्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

प्री-एक्लेम्पसिया : गर्भधारणेदरम्यान प्री-एक्लेम्पसिया म्हणजेच उच्च रक्तदाब किंवा मधुमेह असल्यास हृदयविकाराचा धोका वाढतो. अनेकदा स्त्रिया या समस्यांकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. पॉलीसिस्टिक ओव्हरी सिंड्रोम (पीसीओएस), ल्युपस आणि संधिवात यांसारखे आजार स्त्रियांमध्ये हृदयविकाराचा धोका वाढवतात.



मुदतपूर्व रजोनिवृत्ती : वयाच्या ४५ व्या वर्षापूर्वी रजोनिवृत्ती आल्यास हृदयविकाराचा धोका अधिक वाढतो. रजोनिवृत्ती दरम्यान 'इस्ट्रोजेन' हार्मोनची पातळी कमी झाल्यामुळे हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होतो. पुरुषांमध्ये सहसा रक्तवाहिन्यांमधील अडथळे हे हार्ट अटॅकचे कारण असते. परंतु स्त्रियांमध्ये यासोबतच कोरोनरी मायक्रोव्हस्कुलर डिसीज होण्याची शक्यता जास्त असते, जो सूक्ष्म रक्तवाहिन्यांवर परिणाम करतो. याशिवाय, 'ब्रोकन-हार्ट सिंड्रोम' आणि धमन्यांचे नुकसान होणे यासारख्या स्थिती देखील हार्ट अटॅकचे कारण बनू शकतात. बऱ्याच वेळा 'एंजिओग्राफी' सारख्या सामान्य चाचण्यांमधून स्त्रियांमधील हृदयाच्या समस्यांचे अचूक निदान होऊ शकत नाही. अशा वेळी डॉक्टर्स पीईटी स्कॅन, एमआरएआय आणि इतर प्रगत चाचण्यांचा सल्ला देऊ शकतात.

## गाय करते साधनांचा वापर

प्राण्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल अनेकदा आश्चर्यकारक गोष्टी समोर येत असतात, पण एका गायीने चक्क 'साधनाचा' (टूल) वापर केल्याची घटना जगात पहिल्यांदाच नोंदवली गेली आहे. ऑस्ट्रियामधील 'वेरोनिका' नावाच्या गायीने केवळ वस्तूचा वापरच केला नाही, तर शरीराच्या वेगवेगळ्या भागांना खाजवण्यासाठी त्या वस्तूचा कोणता भाग योग्य आहे, याची निवड करून शास्त्रज्ञांना थक्क केले आहे.

ऑस्ट्रियाच्या आल्प्स पर्वतरांगांमध्ये राहणारे सेंद्रिय शेतकरी विटगर विगेल यांनी त्यांच्या 'वेरोनिका' नावाच्या गायीला अनेकदा तोंडात काठी धरून स्वतःला खाजवताना पाहिले होते. गेल्या ९ वर्षांपासून ती कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय हे करत होती. विगेल



यांनी याचे व्हिडीओ 'युनिव्हर्सिटी ऑफ व्हेटर्नरी मेडिसिन, व्हिएन्ना' येथील संज्ञानात्मक जीवशास्त्रज्ञ ॲलिस औरसपर्ग यांना पाठवले. डॉ. ॲलिस यांच्या मते, 'लोक अनेकदा प्राण्यांच्या कोणत्याही हालचालीला साधनांचा वापर समजतात, पण हा व्हिडीओ वेगळा होता. यात ती गाय त्या वस्तूचा वापर आपल्या शरीराचाच एक भाग असल्यासारखा करत होती.'

या दाव्याची शहानिशा करण्यासाठी शास्त्रज्ञ अँटोनियो ओसुना-मस्कारो आणि त्यांच्या चमूने वेरोनिकाची चाचणी घेतली. त्यांनी तिच्यासमोर जमिनीवर एक मोठा ब्रश ठेवला. या प्रयोगामागचा उद्देश स्पष्ट करताना ओसुना-मस्कारो म्हणाले, 'झाडूला एक कार्यात्मक बाजू (ब्रशचा भाग) आणि एक साधी बाजू (दांडा) असते. जर वेरोनिकाला साधनाची समज असेल, तर ती खाजवण्यासाठी ब्रशच्या भागालाच प्राधान्य देईल, असे आमचे भाकीत होते.' वेरोनिकाने झाडूचा दांडा तोंडात धरून ब्रशच्या बाजूने स्वतःला खाजवले. तिने उलटचा पद्धतीने (दांड्याने) खाजवण्यापेक्षा ब्रशने खाजवण्याला २.५ पट जास्त पसंती दिली. तिने हे सर्व कोणत्याही मानवी मदतीशिवाय किंवा प्रशिक्षणाशिवाय केले. शास्त्रज्ञांच्या मते, ती गाय त्या साधनाची तांत्रिक बाजू समजून घेऊन त्याचा वापर आपल्या शरीराची लांबी वाढवण्यासाठी करत होती. काही काळानंतर या वर्तनात अधिक सूक्ष्म आणि प्रगत पद्धती दिसून आल्या, ज्यावर शास्त्रज्ञ सध्या अधिक अभ्यास करत आहेत. गाईसारख्या पाळीव प्राण्यांमध्ये इतकी प्रगत बुद्धिमत्ता असणे हे जीवशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

# परराज्यातून बेकायदेशीरपणे आणलेल्या विदेशी दारूची बंदी असतानाही बनावट लेबल लावून नगरमध्ये विक्री

**पोलिसांनी नागरदेवळे येथे छापा टाकत केला मोठा साठा जप्त**

नगर – भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत नागरदेवळे येथील पांढरेमळा भागात पोलिसांनी एका घरावर छापा टाकत बाहेरच्या राज्यांत उत्पादित केलेली आणि महाराष्ट्र राज्यात विक्रीस बंदी असलेली विदेशी दारू आणि इतर साहित्य असा एकूण १ लाख ९७ हजार ७४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स.पो.नि.तेजश्री थोरात यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, एसबीआय चौक, छत्रपती शिवाजी महाराज संकुल परिसर येथे अवैध दारूची वाहतूक करणाऱ्या इसमाची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने सदर ठिकाणी जाऊन संशयित इसमास ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान त्याने त्याचे नाव प्रशांत बाबासाहेब पांढरे (वय २६, रा. पांढरे मळा, नागरदेवळे, ता. नगर) असे सांगितले. त्याच्या ताब्यात असलेल्या विदेशी दारूच्या बाटल्यांबाबत अधिक चौकशी केली असता, सदर बाटल्या प्रदिप पंढरीनाथ फडतरे (रा. केकती, भिंगार) यांच्याकडून मिळाल्याचे त्याने सांगितले.आरोपींनी शासनाचा कर बुडवून दुसऱ्या राज्यांतून दारू आणली होती. तसेच त्या बाटल्यांवरील मूळ स्टिकर काढून त्यावर महाराष्ट्रातील उत्पादनाचे बनावट स्टिकर लावण्याचा प्रकार सुरू होता.या धडक कारवाईत पोलिसांनी हॅरिअर चारचाकी वाहन आणि विविध कंपन्यांच्या सिलबंद बाटल्या हस्तगत केल्या आहेत.



परराज्यातून बेकायदेशीरपणे आणलेल्या विदेशी दारूचा साठा पकडल्यानंतर आरोपी व मुद्देमालासमवेत भिंगार कॅम्प पोलीसांचे पथक.

यात मॅजिक मोमेंट, रॉयल चॅलेंज, इम्पेरिअल ब्लू, ओल्ड मंक, रॉयल स्टॅग, किंगफिशर बिअर आणि आयकॉनिक व्हाईट दारूचा समावेश आहे. तसेच दारूच्या बाटल्यांचे खरडलेले लेबल, स्टिकरचे शीट आणि इतर साहित्य असा एकूण १ लाख ९७ हजार ७४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नागरदेवळे येथील पांढरेमळा भागात ही कारवाई करण्यात आली.

पोलिस नाईक संदिप हेमंत थोरात यांनी या प्रकरणाची फिर्याद दिली आहे.या प्रकरणी प्रदिप फडतरे आणि प्रशांत पांढरे या दोघांवर गुन्हा नोंदवला आहे. आरोपींनी संगनमत करून कंपनीची आणि शासनाची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. बाहेरच्या राज्यांची दारू आणून ती इकडे बेकायदेशीरपणे विक्रीसाठी तिच्यावरील लेबल्स बदलण्याचा गोरखधंदा याद्वारे चालवला जात होता. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात व त्यांचे पथकातील पोलीस अंमलदार योगेश पवार, सतीश भांड, मोहन भेटे, राम मोरे, प्रमोद लहारे, संदीप थोरात, कैलास शिरसाठ यांच्या पथकाने केली आहे..



## गुरुवाणी – ७५ तीर्थंकरांचे तप...

प्रभू महावीरांचे तप कसे होते? सुधर्मा स्वामींनी तीर्थंकरांच्या तपाची अनुभूती घेतली. इच्छेचा विरोध नाही तर मनात इच्छा उत्पन्न न होणे हे तप असते. कोणतीही क्रिया होण्यासाठी कळत नकळत इच्छा होत असते. एकदा तीर्थंकरांनी पौर्णिमेला डोळ्यांची पापणी न लवता एकटक एका छोट्या दगडाकडे पाहण्याचे तप सुरू केले होते. तीर्थंकरांच्या तपाची स्पंदने थेट देवलोकात पोहचले. सुधर्मा स्वामी म्हणतात, तीर्थंकरांचे तप अप्रतिज्ञ तप आहे. आपली प्रतिज्ञा मोहनीय कर्म उदयातून होते. तीर्थंकरांचे तप क्षायिक भाव आहे. ते आतील सर्व नकारात्मकता पूर्ण बाहेर काढते. परमात्म्याच्या तपात मेघ गर्जना आणि चंद्राचा शितल प्रकाशही आहे. म्हणून तीर्थंकरांच्या समवशरण मध्ये साप आणि मुंगुसही वैरभाव विसरतात. चंद्राचा प्रकाश, चंदनाचा सुगंध, शब्द सगळ्यांसाठी उपलब्ध आहेत. फक्त तुमच्याकडे डोळे, नाक, कान पाहिजे. आपल्या तपात अटीशर्ती असतात. आपण कधी सुख प्राप्तीसाठी तप करतो तर कधी दु:खापासून वाचण्यासाठी म्हणून तप करतो. परमात्म्याच्या तपाला असा सुखदु:खाचा आधार नसतो. ते अनकंडीशनल आहे. त्यांच्या तपाला चंदनाचा सुवास आहे. चंदन जितके उगळू तितका सुगंध अधिक दरवळतो. आपल्या आत जे आहे त्याला उगळले तर त्याचा दरवळ सुटतो. 'मेहंदी रंग लाती है घिसने के बाद'. तपस्या करणाऱ्या तीर्थंकरांना संगमदेव सहा महिने निरंतर त्रास देत राहिला. पण तीर्थंकरांकडून फक्त चंद्राचा प्रकाश आणि चंदनाचा सुगंधच बाहेर आला. आवडता व्यक्ती समोर आला तर आपला चेहरा खुलतो. नावडता समोर आला तर चेहरा कडवट होतो. तीर्थंकरांचे तसे नसते. म्हणून आपले कोणतेही तप, आराधना तीर्थंकरांसारखी हवी. आपण अनुकूलता असेल तरच धर्माचरण करतो. आपण वेळ असेल तर देव गुरुंच्या दर्शनासाठी जातो, प्रवचनाला जातो. हे कंडीशनल आहे. आपण आराधनेसाठी अधिक वेळ देतो पण आधी स्वतः चे टाइमटेबल पाहतो. हे कंडीशनल धर्माचरण आहे. जे अजिबात अपेक्षित नाही. उत्तराध्ययन श्रुतदेव आराधना परमात्म्याची शिखर आराधना आहे. यातून आपल्याला आपल्या बापाची गरिमा वाढवायची आहे. तीर्थंकरांच्या वाणीची गरीमा वाढवायची आहे. कारण या काळात तीर्थंकर त्यांच्या वाणीतूनच भेटतील. महाबली हनुमानाने प्रभू श्रीरामांची भक्ती करून त्यांची गरिमा वाढवली. त्याने स्वतःची गरिमा नाही वाढवली. अशी गरिमा आपल्याला तीर्थंकरांची वाढवायची आहे. आपल्या बापाची गरिमा ठेवली तरच आपली गरिमा राहील. यासाठी उत्तराध्ययन आराधना आहे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# एमपीएससी पेपरफुटीप्रकरणी अध्यक्षांनी तातडीने राजीनामा द्यावा; मागण्या मान्य न झाल्यास 'राज्यव्यापी जनआंदोलन' उभारणार

**विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा**

नगर – पुणे येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या प्रकरणावरून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिवप्रहार संघटनेने पाठिंबा जाहीर केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच नैतिक जबाबदारी स्वीकारून आयोगाचे अध्यक्ष भीमनवार यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भातील निवेदन निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.



एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच आयोगाचे अध्यक्ष भीमनवार यांनी राजीनामा द्यावा, या मागणीचे निवेदन शिवप्रहार संघटनेच्यावतीने निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांमधील कथित गैरप्रकारांमुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त होत आहे. विद्यार्थी मोठ्या मेहनतीने, वेळ आणि आर्थिक खर्च करून परीक्षांची तयारी करतात. मात्र, परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकारांमुळे त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले जाण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना न्याय मिळावा आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास कायम राहावा, यासाठी शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी भूमिका शिवप्रहार संघटनेने मांडली.

एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाची तातडीने निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. भविष्यात अशा प्रकारचे गैरप्रकार घडू नयेत, यासाठी परीक्षा व्यवस्थेतील सुरक्षा उपाययोजना अधिक सक्षम कराव्यात आणि संपूर्ण परीक्षा प्रक्रिया पारदर्शक करावी, असेही संघटनेने नमूद केले.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यास शिवप्रहार संघटना हा मुद्दा राज्यभर उपस्थित करून लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन उभारेल, असा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विशाल म्हस्के यांनी दिला. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित या गंभीर प्रश्नावर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना शिवप्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विशाल म्हस्के यांच्यासह संदीप संसारे, संदीप सायंबर, सागर घोरपडे, शिवा शिंदे, नितीन ढाळे, विकी निकरड, अभिजीत भांडवलकर, अमित कचरे, सागर खळे, अतुल चौधरी, प्रशांत सराईकर, बंडू भोसले, शिवम देवगुणे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोन्या-चांदीच्या दरात झाली वाढ

नवीदिल्ली – सोन्या-चांदीच्या दरात ९ ऑक्टोबर रोजी वाढ झाली आहे. इंडिया बुलियन अँण्ड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा दर १,९६८ रुपयांनी वाढून १.५० लाख रुपयांवर पोहोचला आहे.

यापूर्वी ८ ऑक्टोबर रोजी तो १.४८ लाख रुपयांवर होता. त्याचवेळी, एक किलो चांदीचा दर ४,०६४ रुपयांनी वाढून २.२१ लाख रुपयांवर पोहोचला आहे, जो गुरुवारी २.१७ लाख रुपये होता.

यावर्षी सोन्या-चांदीच्या दरात सातत्याने चढ-उतार पाहायला मिळत आहेत. २०२६ मध्ये आतापर्यंत सोने १६,४१५ रुपयांनी महागले आहे. त्याचवेळी, चांदी ९,२५० रुपयांनी स्वस्त झाली आहे. ३१ डिसेंबर २०२५ रोजी १० ग्रॅम सोन्याचा दर १.३३ लाख रुपये होता, जो आता १.५० लाख रुपयांवर पोहोचला आहे.

## श्री संत भगवान बाबा विशेषांकासाठी साहित्य पाठवा

पाथर्डी – विजयादशमी निमित्त दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या श्री संत भगवान बाबा विशेषांकासाठी साहित्य पाठवण्याचे आवाहन श्री संत भूमी कला, क्रीडा प्रतिष्ठानचे सचिव प्रा. जनार्धन बोडखे त्यांनी केले आहे. श्री संत भगवान बाबांच्या जीवनावर आधारित लेख, कविता आणि दुर्मिळ फोटो यावर आधारित साहित्य पाठवावे. संत भगवान बाबांनी मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समाज जागृती आणि प्रबोधनाची भरीव कार्य केले आहे. त्यांनी सामान्य भक्तांना भगवंत भक्तीची दिशा दाखवली. त्या थोर महात्म्याला अभिवादन करण्याची परंपरा या विशेषांकाद्वारे कायम राखली जाते. इच्छुकांनी आपले साहित्य प्रा. जनार्दन बोडखे, सिद्धी मेडिकल नवी पेठ पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर या पत्त्यावर पाठवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी मो. ९४ २१ ४७ ९१ ८० वर संपर्क साधावा



अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगरच्या विद्यार्थिनी कु. सोनाली चौधरी व कु. धनश्री सुरवसे यांनी राज्यस्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय पारितोषिक मिळविले.

# राज्यस्तरीय पोस्टर स्पर्धेत अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीच्या सोनाली चौधरी, धनश्री सुरवसे यांनी मिळवले द्वितीय पारितोषिक

**ट्रॉफी, प्रमाणपत्र व ५,००० रू. रोख पारितोषिकाने गौरव**

नगर – अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगरच्या D.Pharm विद्यार्थिनी कु. सोनाली चौधरी व कु. धनश्री सुरवसे यांनी राज्यस्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय पारितोषिक मिळविले.

P.E. Society's College of Pharmacy Research Center, Phaltan यांच्या वतीने आयोजित "INNOPHARMA 2.0' या राज्यस्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ८ ऑक्टोबर रोजी फलटण येथे झालेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी फार्मसी क्षेत्रातील विविध नाविन्यपूर्ण विषयांवर पोस्टर्स सादर केली.

अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीच्या सोनाली चौधरी व धनश्री सुरवसे यांनी आपल्या विषयाची आकर्षक मांडणी, प्रभावी सादरीकरण आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोन यांच्या जोरावर द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि ५,००० रू. रोख पारितोषिक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या यशासाठी विद्यार्थिनींना प्रा. माधुरी पवार, प्रा. वृशाली गायकवाड आणि प्रा. शीतल खंडागळे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांनी सोनाली चौधरी व धनश्री सुरवसे यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांच्या यशामागे मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचेही कौतुक केले.

# संवेदनशील व कर्तव्यदक्ष न्यायाधीश निर्माण होण्यासाठी व्याख्यानमाला उपक्रम कौतुकास्पद : न्या. शिवाजी कचरे

**वकील संघटनेच्या व्याख्यानमालेचे उद्घाटन**

नगर – न्यायिक सेवेत प्रवेश करण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या ज्युनिअर वकिलांना मार्गदर्शन करण्यासाठी वकील संघटनेचा व्याख्यानमालेचा उपक्रम व घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. यामधून भविष्यात चांगले संवेदनशील व कर्तव्यदक्ष न्यायाधीश निर्माण होतील, असा विश्वास जिल्हा प्रधान व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांनी व्यक्त केला.

जिल्हा न्यायालयातील दिवाणी न्यायाधीश पदाच्या परिक्षार्थी वकिलांसाठी अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने मार्गदर्शक व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेचा शुभारंभ जिल्हा प्रधान व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला.



अहमदनगर बार असोसिएशनच्या मार्गदर्शक व्याख्यानमालेचे उद्घाटन करताना जिल्हा प्रधान व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे. समवेत जिल्हा न्यायाधीश आर.एस.गुप्ता, वकील संघटनेचे अध्यक्ष अ‍ॅड.कृष्णा झावरे, उपाध्यक्ष अ‍ॅड.भाऊसाहेब घुले, अ‍ॅड.युवराज पाटील आदी.

यावेळी जिल्हा न्यायाधीश आर.एस.गुप्ता, वकील संघटनेचे अध्यक्ष अ‍ॅड.कृष्णा झावरे, उपाध्यक्ष अ‍ॅड.भाऊसाहेब घुले आदींसह सर्व न्यायिक अधिकारी वर्ग व परिक्षार्थी वकील उपस्थित होते. ही व्याख्यानमाला शनिवार व रविवारी चालणार आहे.

न्या. कचरे पुढे म्हणाले, न्यायाधीश हे केवळ अधिकारी पद नसून समाजाने आपल्यावर टाकलेली विश्वासाची ती मोठी जबाबदारी आहे. सर्व कायद्यांच्या बारकाईने अभ्यास करून या कायद्यांचा लाभ पक्षकाराला कसा होईल यासाठी प्रयत्नशील रहा. कायद्याचे ज्ञान मिळण्यासाठी व्याख्यानमाला हा उत्तम पर्याय आहेच पण न्यायालयातील दैनंदिन कामकाज शिकण्यासाठी व अनुभवासाठी तुमचे वरिष्ठ वकिलाचे कार्यालय हे सर्वात मोठे ज्ञान मिळवण्याचे स्थान आहे. त्यामुळे आपल्या वरिष्ठ वकिलाकडे काम करताना बारकाईने अभ्यास करून अनुभव घ्या, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविकात अ‍ॅड. कृष्णा झावरे म्हणाले, जिल्हा न्यायालयात वकील संघटना कुटुंब म्हणून काम करत आहे. या भावनेने ज्युनिअर वकिलांसाठी मार्गदर्शक व्याख्यानमाला सुरु करताना मोठे समाधान वाटत आहे. यामधून ज्युनिअर वकिलांना चांगले ज्ञान मिळणार असून उत्तम न्यायाधीश होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बळकटी मिळणार आहे. या व्याख्यानमालेत २५ ते ३० तज्ज्ञ न्यायाधीश परिक्षार्थी वकिलांना विविध कायद्यांचे सखोल मार्गदर्शन करणार आहेत. याचा लाभ सर्वांनी घ्यावा.

या कार्यक्रमास वकील संघटनेचे सचिव अ‍ॅड.विनोद शेटे, माजी सचिव अ‍ॅड.युवराज पाटील, कार्यकारिणी सदस्या अ‍ॅड.प्राजक्ता करांडे, अ‍ॅड.दिव्या निमसे, अ‍ॅड.यश सावंत, अ‍ॅड.आशिष शिंदे, अ‍ॅड.अभिषेक पगारे, अ‍ॅड.कोमल साळवे, अ‍ॅड. स्वाती डमाळे आदीसह वकील उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अ‍ॅड.आरती सरोदे व अ‍ॅड.कोमल मुनोत यांनी केले. अ‍ॅड.सोमेश पालीवाल यांनी आभार मानले.

# शरदचंद्रजी पवार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजचा उत्कृष्ट निकाल



नमेरा खान | श्वेता जाधव | मनिषा देशमुख | मयुरी चंदन | कविता अढागळे | प्रिती मेहेत्रे

नगर – महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या उन्हाळी २०२६ परीक्षेचा शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, वडाळा महादेव, श्रीरामपूर येथील तृतीय वर्ष बी. एच. एम. एस. (२०२२) सी. बी. डी. सी. चा निकाल १०० टक्के, चतुर्थ वर्ष बी. एच. एम. एस. (२०२२) सी.बी.डी. सी. चा निकाल ९८.८८ टक्के लागलेला आहे. तृतीय वर्ष बी. एच. एम. एस. च्या एकूण ७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली एकूण ७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. चतुर्थ बी. एच. एम. एस. च्या एकूण ९० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली त्या पैकी ८९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर ०१ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहे. नेहमी प्रमाणे शरदचंद्रजी पवार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल मध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या तृतीय आणि चतुर्थ वर्ष बी. एच. एम. एस. विद्यार्थ्यांनी परीक्षेत उज्वल निकालाची परंपरा कायम राखली असल्याची माहिती शिवा ट्रस्ट छत्रपती संभाजीनगरचे चेअरमन डॉ. बाळासाहेब शिवाजीराव पवार यांनी दिली.

महाविद्यालयातील तृतीय वर्ष बी. एच. एम. एस. मधील प्रथम क्रमांक खान नमेरा नदिम ६७.७८ टक्के, द्वितीय क्रमांक जाधव श्वेता मोहन ६६.९४ टक्के, तृतीय क्रमांक देशमुख मनिषा दत्तात्रय ६६.८४ टक्के यांनी पटकावला. चतुर्थ बी. एच. एम. एस. मधील प्रथम क्रमांक चंदन मयुरी विजय ६९.४ टक्के, द्वितीय क्रमांक अढागळे कविता बाळू ६८.२६ टक्के, म्हेत्रे प्रिती बालाजी ६८.६ टक्के यांनी पटकावून उत्तम गुण मिळवून कॉलेजची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली.

विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन डॉ. बाळासाहेब पवार, संस्थेचे संचालक दिलीप पवार, प्रशासकीय अधिकारी श्रीकांत पवार, प्राचार्य डॉ. रिझवान अहमद, प्रा. डॉ. दर्शनी साबळे, डॉ. बी. हरिश्चंद्रे, डॉ. पागीरे संगीता, डॉ. अभय पानसंबळ, डॉ. आगळे अनिता, डॉ. जाधव भगीरथ, डॉ. दहे विद्या, डॉ. जेठलिया विपिन, डॉ. पौर्णिमा कळमकर, डॉ. पवार विजय, डॉ. रियाज पटेल, डॉ. जावळे देवेंद्र, डॉ. रेखा नाईक, डॉ. सोनवणे प्रतिमा, डॉ. कळमकर प्रदीप, डॉ. टेंभूर्णे विशाखा, डॉ. महेजबीन शेख, डॉ. सूरज थोरात, डॉ. शेख मुनज्ञा, डॉ. समर रणसिंग, डॉ. दीप्ती गाडेकर, डॉ. आंबेकर प्राची, डॉ. गायकवाड बाळकृष्ण, डॉ. कोकाटे महेश, डॉ. मेमन मोहम्मद नाकीब अदम, डॉ. हीना जातु, डॉ. सेलवन सेन्थिल, डॉ. शिंगवी मीनाक्षी, डॉ. पवार श्वेता, डॉ. लता सगळगिळे, डॉ. अमोल म्हस्के, डॉ. मिसबा खान यांनी अभिनंदन केले.

# अभाविपतर्फे 'देवी अहिल्या युवती संमेलन' उत्साहात



नगर – अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, दक्षिण अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने 'देवी अहिल्या युवती संमेलन' कार्यक्रमाचे आयोजन ७ ऑक्टोबर रोजी माऊली संकुल सभागृह, झोपडी कॅन्टीन, सावेडी, अहिल्यानगर येथे करण्यात आले. सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत झालेल्या या संमेलनास जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील सुमारे ६०० विद्यार्थिनींची उपस्थिती राहिली व संमेलन उत्साहात पार पडले.

युवती संमेलनाचे आयोजन दोन सत्रांमध्ये करण्यात आले. या संमेलनाचे उद्घाटन जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, कोहिनूर मॉलच्या संचालिका सौ. श्वेताताई गांधी, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या राष्ट्रीय मंत्री कु. क्षमा शर्मा, संमेलन प्रमुख सृष्टी ताके, जिल्हा संयोजक रोहन भुजबळ यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यामध्ये अभाविपच्या राष्ट्रीय मंत्री कु. क्षमा शर्मा यांनी विद्यार्थिनींना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा ७८ वर्षांचा प्रवास आणि युवतींच्या सामाजिक सहभागाविषयी मार्गदर्शन केले. तसेच समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेल्या परिवर्तनाच्या पाच महत्त्वपूर्ण मुद्द्यांची मांडणी त्यांनी केली. युवतींनी केवळ शिक्षण आणि करिअरपुरते मर्यादित न राहता सामाजिक प्रश्नांमध्येही सक्रिय सहभाग घेऊन नेतृत्वाची भूमिका बजावावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी विद्यार्थिनींना वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थिनींनी डिजिटल माध्यमांचा वापर करताना आवश्यक ती खबरदारी घ्यावी, तसेच महिलांनी आपल्या सुरक्षिततेबाबत सजग व जागरूक राहावे, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच सौ. श्वेताताई गांधी यांनी विद्यार्थिनींना उद्योजकतेकडे वळण्याचे आवाहन केले.

दुसऱ्या सत्रात महिला सुरक्षा व संस्कृती यावर भाषण व चर्चासत्र झाले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून पुण्याचे अ‍ॅड. वर्षाताई डहाळे यांनी विषयाची मांडणी केली यामध्ये विद्यार्थिनींनी आपल्या सांस्कृतिक परंपरेबद्दल आत्मीयता जागृत केली. तसेच या भाषण सत्रास महापौर सौ. ज्योतीताई गाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या दोन्ही सत्रांना विद्यार्थिनींचा प्रतिसाद लाभला. यासोबतच विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले. संमेलनाच्या शेवटी भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. या शोभायात्रेत संमेलनास विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. माऊली संकुल सभागृहापासून सुरू झालेली शोभायात्रा प्रोफेसर चौक येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शोभायात्रेचा समारोप करण्यात आला.

